देवगड महाविद्यालयाला
आमच्या हार्दिक शुभेच्छा !


# देवगड ग्रामपंचायत

शिक्षण विकास मंडळाचे

## देवगड महाविद्यालय कला आणि वाणिज्य

# रसराज


८१-८२



ज्यांच्या आशीर्वादाने कॉलेज सुरू झाले
वाढले आणि वाढणार
ते आमचे स्फूर्तिस्थान



संस्थेचे अध्यक्ष–सन्माननीय श्री. बापूसाहेब पंतवालावलकर



शिक्षण विकास मंडळाचे

## देवगड महाविद्यालय कला आणि वाणिज्य

# रसराज

संपादक:— प्राचार्य गोपाळराव मयेकर.

# रसराज

## संपादक मंडळ

मुख्य संपादक – प्राचार्य गोपाळराव मयेकर.

सह संपादक – प्रा. पुरूषोत्तम गोठोस्कर.

प्रा. बाबुराव गायकवाड.

प्रा. देवदत्त तुंगार.

विद्यार्थी प्रतिनिधी – श्री. मनोहर राणे.

श्री. मोहम्मद खान.

श्री. संजीव कुळकर्णी.

प्रकाशक – विद्यार्थी मंडळ, देवगड महाविद्यालय

मुद्रण स्थळ – शामदीप प्रिंटर्स, कट्टा - मालवण.

र
स
रा
ज

## अंतरंग

संपादकीय– प्राचार्य गोपाळराव मयेकर.
वार्षिक वृतांत–
परवड– प्रा. बाबुराव गायकवाड.
आमचे मराठीचे शिक्षक– अनिल ठाकूर.
परदेसी– सूरेखा शिर्के.
शिकार– अलका फाटक.
राखीबंधन– शिवप्रसाद पेडणेकर.
जेव्हा शाहू गेला– प्रमोद घाडीगावकर.
राष्ट्रीय सेवा योजना-एक शिबीर (अनुभव)
मला दिसलेले जगन्नाथभाऊ- प्रा. ल. गोलतकर
एका इश्वरनिष्ठाचा उत्कट मनोदय- पागनीस
प्लीज एक्सक्यूज मी- संजय मालंडकर.
कौशल्य- एम्. आर. खान.
The Fly– Sanjeev Kulkarni.
काव्य, विनोद व इतर-
सुशिल राणे, रामकृष्ण पेडणेकर, अनंत जाधव
नंदकिशोर धुरी, कु. निता नाबर: संजय
पाटणकर, कु. आशालता बर्वे, धोंडू सरवणकर
सुभाष कोदे, कु. अलका फाटक

# DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE
# DEVGAD DIST.— SINDHUDURG.
# GYMKHANA & CULTURAL ACTIVITIES

| | |
|---|---|
| General Secretary– | Shri Rane M. R., T. Y. B. Com. |
| Entertainment & Gathering | Shri Teli M. R., T. Y. B. A. |
| N.S.S. Boy's Representative | Shri Malandkar S. L., T. Y. B. Com. |
| N.S.S. Ladie's Representative | Miss Phatak A. S., T. Y. B. Com. |
| Wall Paper | Shri Khan M. R., S. Y. B. Com |
| Study Circle | Shri Rane M. R., T. Y. B. Com. |
| Excursion & Tour | Shri Belnekar P. S., T. Y. B. Com. |
| Elocution and Debating | Shri Kode S. P., F. Y. B. Com |
| Ladie's Representative | Miss Bhandari S. N., F. Y. B. A. |
| Publicity and Information. | Safary P. M. |
| University Representative | Shri Koyande H. D. |

## CLASS REPRESENTATIVE

| | |
|---|---|
| F. Y. B. A. | Shri Gawade N. Y. |
| S. Y. B. A. | Shri Koyande S. R. |
| T. Y. B. A. | Shri Gaonkar R. R. |
| F. Y. B. Com. | Shri Khadilkar D. N. |
| S. Y. B. Com. | Shri Rane S. A. |
| T. Y. B. Com. | Shri Koyande H. D. |

# DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE JR. COLLEGE, DEVGAD, DIST.- SINDHUDURG.
# GYMKHANA & CULTURAL ACTIVITIES

| | | |
|---|---|---|
| General Secretary– | Shri. Khanwilkar A. R. | |
| Gymkhana | Shri. Kelkar M. B., | XII Arts. |
| Entertainment & Gathering | Shri. Mirashi M. N., | XII Arts. |
| Wall Paper | Shri. Kulkarni S. V., | XII Com. |
| Study Circle | Shri. Shirsat S. G., | XII Com. |
| Excursion & Tour | Shri. Khanwilkar A. R., | XII Arts. |
| Elocution and Debating | Miss. Pethe V. V., | XI Com. |
| Ladie's Representative | Miss. Kulkarni S. S., | XII Com. |
| Publicity and Information. | Shri. Maiman T.B., | XII Com. |

## CLASS REPRESENTATIVE

| | |
|---|---|
| XI Commerce | Shri Parkar S. S. |
| XI Arts | Shri Damri T. R. |
| XII Commerce | Shri Joshi K. B. |
| XII Arts | Shri Khanwilkar A.R. |

# संपादकीय . . . . .

रसराज या विद्यार्थ्यांनी चालविलेल्या भित्तीपत्रिकेचा हा छापील अंक वाचकाना सादर करीत असताना आमच्या विद्यार्थ्यांचे मन:पुर्वक कौतुक करावेसे वाटते. ही संकल्पना त्यांची, उत्साह त्यांचा आणि परिश्रमही त्यांचे. असाच एक उपक्रम महाविद्यालयाच्या पहिल्याच वर्षी विद्यार्थी वर्गाने केला होता. देवगड सारख्या मागासलेल्या भागात देवगड महाविद्यालयासारखा प्रपंच उभा करणे फार अवघड काम होते. आज २३ एकर स्वत:च्या मालकीच्या जमिनीवर दहा-बारा लाख रूपये किंमतीची स्वतंत्र इमारत डौलदारपणे उभी राहिली हे शिक्षण विकास मंडळ या पालक संस्थेच्या चिकाटीच्या प्रयत्नाना आलेले गोड फळ होय. आजही या महाविद्यालयाच्या विकासाच्या इतर अनेक कामांसाठी पैसा हवा आहे. अनेक अडचणीतून मार्ग काढीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या योजना आखायच्या आहेत. आज फक्त भक्कम पाया तयार झाला आहे एवढेच.

विद्यार्थी प्रतिनिधी मंडळ ही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची लोकशाही पध्दतीने निवडून येणारी विधानसभाच होय. विविध प्रकारचे कार्यक्रम या विद्यार्थी सभेमार्फतच आखले जातात. अशा उपक्रमां पैकीच रसराज भित्तिपत्रिका हा विद्यार्थ्यांच्या लेखन गुणाना वाव देवू शकणारा एक उपक्रम. हे भिंतीवरचे लिखाण या अंकाच्या रूपाने छापील स्वरूपात वाचकांसमोर ठेवीत आहोत. आर्थिक अडचणीमुळे महाविद्यालयाचे छापील वार्षिक आम्ही गेल्या आठ वर्षात निश्चीत रूपात काढू शकलो नाही. या पुढे त्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे. प्रस्तुतचा अंक हे

त्याचे अगदी प्राथमिक रूप. तरीही या अंकाने महाविद्यालयाच्या विविध कार्यक्रमांचा अहवाल, अभ्यासातील प्रगती, विविध क्षेत्रातील नैपुण्य वाचकांसमोर येईल. आमच्या छोट्या मोठ्या लेखकानी, कवींनी अल्पशा प्रमाणात का होईना वाचकांचे मनोरंजन आणि उदबोधन केले तरी त्यांच्या श्रमाचे सार्थक झाले असे मी समजेन.

रसराजचा छापील अंकाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांनी स्वपरिश्रमानेच नव्हे तर स्वखर्चानेही उभारला आहे. या अंकाच्या खर्चाची व्यवस्था जाहिरातींच्या रूपाने त्यानीच केली. स्वावलंबनाचा हा एक आदर्शच होय. त्याबद्दल १९८१-८२ या वर्षाच्या विद्यार्थी मंडळाचे, त्यांचा जनरल सेक्रेटरी मनोहर रमाकांत राणे याच्या नामोल्लेखासकट अभिनंदन करीत आहे.

या अंकाची छपाई थोडक्या खर्चात व मोजक्या वेळात करून घेणे कठीण काम होते पण कट्टा-मालवण येथील शामदीप प्रिंटर्स यानी ही जबाबदारी उचलली. प्रेसचे पार्टनर पावसकर व भोगटे आणि कर्मचारी वर्ग यांचे आम्ही आभारी आहोत. घाईगर्दीमुळे या अंकात अनेक चुका राहून जाण्याची शक्यता आहे. त्याबद्दलही आम्ही दिलगीर आहोत. हा अंक सिद्ध करण्यासाठी संपादक मंडळातील सर्व सहकाऱ्यांचे कौतुक करावयास हवे कारण अनअनुभवी असून सुद्धा ते वाचकाहाती हा सुंदर अंक देऊ शकले.

-- प्राचार्य- गोपाळराव मयेकर.

–संपादक–

# DEVGAD COLLEGE OF ARTS & COMMERCE JR. COLLEGE, DEVGAD, DIST.- SINDHUDURG.

## TEACHING STAFF

Principal **G. G. Mayekar.,** M. A.
Prof. **P. S. Gothoskar.** M. A.
Prof. **L. D. Golatkar.,** M. A. B. Ed. D. P. Ed.
Prof. **M.M. Gawade.,** M. A. B. Ed.
Prof. **H. L. Patwardhan.,** M. Com., C. A.
Prof. **P. S. Rande.,** B. Com. L. L. B.
Prof. **B. D. Gaikwad.,** M. A.
Prof. **T. Selvaraj.,** M. A. B. Ed.
Prof. **S. R. Dhumal.,** M. Com.
Prof. **S. M. Sontakke.,** M. A.
Prof. **A. P. Mirikar.,** M. A. L. L. B.
Prof. **D. B. Balwan.,** M. Com.
Prof. **M. S. Chavan.,** M. A.
Prof. **D. H. Tungar.,** M. A.
Shri. **A. G. Pandurkar.,** M. A.
Shri. **S. G. Kulkarni.,** M. A.

## NON—TEACHING STAFF

| | | |
|---|---|---|
| Shri. | **G. B. Godbole.,** | Accountant. |
| Shri. | **M. V. Lele.,** | Jr. Clerk. |
| Shri. | **S. S Patil** | Librarian. |
| Shri. | **S. A. Palsule.,** | Jr. Clerk. |
| Shri. | **Y. T. Deoulkar.** | Head peon. |
| Shri. | **C. Y. Mahadik.** | Peon. |
| Shri. | **A. K. Bane,** | Watchman |
| Shri. | **V. V. Dhopale,** | Peon |

# देवगड महाविद्यालय, देवगड
# वार्षिक अहवाल १९८१–८२

## निकाल

प्रतिवर्षाप्रमाणे १९८० मध्ये घेण्यात आलेल्या विद्यापीठांच्या परीक्षामध्ये महाविद्यालयाने निकालांची उज्ज्वल परंपरा राखली. निकाल पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| टी. वाय. बी. ए. | ७५ % |
| एस्. वाय. बी. ए. | ११.१ % |
| टी. वाय्. बी. कॉम्. | ८२ % |
| एस्. वाय. बी.ए. | ८० % |
| एफ्. वाय्. बी. ए. | ८८ % |
| एफ्. वाय्. बी. कॉम्. | ४८ % |
| बारावी आर्टस् | २३.९ % |
| बारावी कॉमर्स् | ७०.७ % |

## विविध सांस्कृतिक उपक्रम

अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या जीवनातील सांस्कृतिक अंगाचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणाना चालना मिळावी या उद्देशाने या वर्षी निवडून आलेल्या प्रतिनिधी मंडळाने निरनिराळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी मोठ्या कुशलतेने केली. अशा कार्यक्रमा पैकी पंधरा ऑगस्ट, गोकुळाष्टमी, गांधी जयंती हे विशेष लक्षात राहातील असे कार्यक्रम झाले.

वाणी ही माणसाला मिळालेली फार मोठी देणगी आहे. तिचा सतत चांगल्या प्रकारे विकास होणे यापेक्षा आनंद नाही. वाणी चांगली तर वक्तृत्व चांगले वक्तृत्व ही एक कला आहे. तिची जोपासना होण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात 'गांधीजी एक व्यक्तिमत्व' या विषयावर एक भाषणमाला घेण्यात आली. त्याचप्रमाणे 'पुरूषांपेक्षा स्त्रिया श्रेष्ठ' या विषयावर वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात अनुक्रमे

कु. अलका हर्डीकर, कु. सुनंदा आपटे व कु. मीना सप्रे यांनी नंबर पटकावले.

तसेच प्राचार्य गोपाळराव मयेकर यांचे 'शब्द एक शक्ती', श्री. शांतीलाल शहा 'व्यक्तित्व आणि विकास' तसेच पुणे येथील पोद्दार महाविद्यालयातील प्रा. डॉ. अशोक कामत 'आधुनिक संत--राजर्षि शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. आंबेडकर' या विषयावर सुबोध अशीं व्याख्याने झाली. राष्ट्रीय एकात्मता पंधरावडयाच्या निमित्ताने तहसीलदार श्री. भटसाहेब यांचे व्याख्यान झाले. देवगड येथील डॉ. भा. वा. आठवले यांनी संगीतासंबंधी उपयुक्त माहिती दिली.

---

# राष्ट्रीय सेवा योजना

पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यात सेवा, शिस्त, जनसंपर्क साधता यावा या दृष्टीने महाविद्यालयाच्या स्थापनेपासूनच महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना कार्य करीत आहे. राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे देवगड महाविद्यालयाचे भुषणच! यावर्षी राष्ट्रीय सेवा योजने चा शुभारंभ दि. २८।८।८१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या हस्ते सरकारी दवाखाना, देवगड येथे झाला. सदर दिवशी वृक्षारोपण व वृक्षारोपणासाठी दवाखान्याच्या आवारात खड्डे खणले. तसेच डॉ. सुहास गानू यानी स्वयंसेवकाना दवाखान्यात कोणती सेवा करता येईल याविषयी माहिती दिली.

दि. १ डिसेंबर ते १५ डिसेंबर या कालावधीत गोवा कर्करोग या संस्थेच्या मदतीसाठी २० स्वयंसेवक-यांनी ४३४ रु. विविध ठिकाणच्या लोकांकडून गोळा करुन दिले. महाराष्ट्र शासन नगररचना आणि मुल्य-निर्धारण विभाग प्रादेशिक योजना, रत्नागिरीच्या वतीनें देवगड तालुक्यातील पेंढरी व मिठबांव या दोन गावांतील कुटुंबांची सामाजिक, आर्थिक आणि स्थलांतर विषयीची पहाणी केली.

दि. १५ आक्टोबर ते २४ आक्टोबर या कालावधीत मुणगे येथे ग्रामीण पुनर्रचना शिबीर घेण्यात आले. सदर शिबीरात सुमारे ९० शिबिरार्थिनी भाग घेतला होता.

शिबीराच्या उद्‌घाटनासाठी देवगडचे तहसीलदार श्री. भटसाहेब तर समारोहासाठी देवगडचे लोकप्रिय आमदार श्री. दादासाहेब राणे हे लाभले होते. शिबीरात ग्रामीण भागातील अंधश्रद्धा निर्मूलन, समाजशिक्षण व अन्य सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच श्रमदानाने लब्धेवाडीतील २०० मी. लांबीचा व ३ मी. रुंदीचा रस्ता त्याचप्रमाणे काटिवणेवाडीतील सुमारे २ फर्लांग लांबीचा व ४ मी. रुंदीचा रस्ता तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे लब्धेवाडीतील मराठी शाळेतील छप्पर झापानी शाकारुन दिले.

शिबीराला राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी प्रमुख व प्रौढ शिक्षण विभाग, मुंबई येथील प्रा. मुरलीधर गोडे, रत्नागिरीच्या गोगटे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख प्रा. मुरलीधर कोल्हटकर, देवगड येथील देवदुर्गचे श्री. शि. स. देसाई व शेठ म. ग. हाय-स्कूल मधील शिक्षक देशपांडे व देवगड येथील नागरीक श्री. हरिभाऊ नलावडे यानी भेटी दिल्या, श्री दादा-साहेब बांबुळकर, श्री. हरि चिले, मुख्याध्यापक श्री भगवती विद्यालय मुणगे व श्री. पुजारे सरपंच, श्री. पुजारे गुरुजी यानी सहभागी होऊन मार्गदर्शन केले.

शिबिरार्थिनी केलेल्या कार्यक्रमास मुणगे ग्राम--

स्थांनी व श्री पंत वालावलकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेला प्रेमाचे प्रतीक म्हणून पाणी पिण्याचे दोन जग भेट दिले यात आमच्या शिबिराच्या यशाची पावती मिळाली असे आम्ही समजतो.

| अध्यक्ष व प्राचार्य | उपाध्यक्ष |
|---|---|
| **प्रा. गोपाळराव मयेकर** | **प्रा. ल. दा. गोलतकर** |
| प्रमुख संचालक | सहाय्यक |
| **प्रा. बाबुराव गायकवाड** | **प्रा. सुरेश सोनटक्के** |

विद्यार्थी प्रमुख

**श्री. संजय मालंडकर**

**कु. अलका फाटक**

**श्री. मनोहर राणे**

---

# वार्षिक स्नेहसंमेलन

प्रतिवर्षी महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन म्हणजे एक प्रकारचा उत्सवच असतो. संमेलन म्हणजे कॉलेज जीवनातील वसंत ऋतु. स्नेहसंमेलनाचा सोहळा आनंदी व उद्‌बोधक होण्यासाठी प्रसन्न व्यक्तिमत्व असलेले पाहुणे मिळणे आवश्यक असते. त्यादृष्टीने अध्यक्ष म्हणून पद्‌मश्री कविवर्य श्री. बा. भ. बोरकर व प्रमुख पाहुणे म्हणून बॅ. शरद पालव हे लाभले होते.

सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'स्नेहांकित संजय' हे नाटक व विद्यार्थिनीनी 'ज्योती' ही एकांकिका सादर केली. त्याचप्रमाणे नावीण्यपूर्ण व मनोरंजनपूर्ण गीतमाला, पोवाडा हे कार्यक्रम सादर करण्यात आले.

| विद्यार्थी प्रमुख | स्नेहसंमेलन प्रमुख |
|---|---|
| **मोहन तेली** | **टी. सेल्व्हराज** |

सहाय्यक

**प्रा. मिरीकर**

---

# क्रीडा विभाग

दि. २२ व २३ जानेवारी रोजी महाविद्यालयाचा क्रीडामहोत्सव साजरा करण्यात आला, क्रीडामहोत्सवाचे उद्‌घाटन युनियन बँकेचे मॅनेजर श्री. धनवटकर यांचे हस्ते झाले. प्रतिवर्षा प्रमाणे बैठ्या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या जिल्हा पातळीवर महाविद्यालयाचा संघ सावंतवाडीस गेला होता.

| विद्यार्थी प्रमुख | प्रमुख प्राध्यापक |
|---|---|
| **श्री. नितीन देशपांडे** | **प्रा. ल. दा. गोलतकर** |

---

# रसराज

१५ ऑगष्ट स्वातंत्र्यदिनाच्या मुहूर्तावर यावर्षी–च्या रसराजाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या हस्ते झाले. या वर्षाच्या रसराजमधील दर्जेदार कथा, कविता व लेख वाचून 'रसराज' हे ही देवगड महाविद्यालयाचे प्रमुख वैशिष्टय ठरेल असे आम्हास वाटते.

| विद्यार्थी प्रतिनिधी | प्रमुख |
|---|---|
| सिनि- **एम. आर. खान** | **प्रा. गोठोस्कर** |
| ज्युनि- **संजीव कुळकर्णी** | |

# सहल विभाग

यावर्षी महाविद्यालयाची सहल गोवा येथे नेण्यात आली होती. सुंदर व स्वच्छ रस्ते, पक्ष्यांच्या संगीतात आणि निर्मळ झऱ्यांच्या तालात डोलणाऱ्या उंच उंच पोफळी, पाहुण्यांच्या स्वागतासाठी केळचांचा डोंगर डोक्यावर घेऊन नम्र झालेल्या केळी, मनाला प्रवित्र करणारी आणि तृप्ती देणारी देवळे आणि हिंदु व खिश्चन या दोन संस्कृतींचा जेथे संगम झाला आहे अशा गोव्याचे दर्शन घेणे म्हणजे निसर्गाचे अमाप सुख भरभरुन घेणे. त्याचा स्मृतीगंध विद्यार्थ्यांच्या मनात चिरकाल रेंगाळत राहील. पूर्वेस सह्याद्रीची उत्तुंग शिखरे व पश्चिमेस अफाट अरबी समुद्र यांच्यामध्ये वसलेला व हिरव्या वनश्रीने नटलेला गोवा पाहाण्यासाठी ४० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भाग घेतला.

प्रमुख प्राध्यापक
**प्रा. मधुकर गावडे**

# ग्रंथालय व पुस्तकपेढी

३०० विद्यार्थी संख्या असणाऱ्या आमच्या महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये १ लाख रुपये किमतीचे साडे सहा हजार ग्रंथ आहेत. २५ हजार रु. किमतीचे १४०० ग्रंथ देणगी रुपाने देऊन एस्. एस्. केळकर, मुंबई यांनी बहुमोल मदत केली आहे. चालू वर्षी भारतातील नामवंत संस्थांनी २० नमुना प्रती भेट म्हणून दिल्या. मुंबईचे श्री. ना. स. भागवत यानी स्वतःहून अभ्यासासाठी उपयुक्त असे ४ दुर्मिळ ग्रंथ भेट म्हणून दिले. महाविद्यालयातील प्रा. धुमाळ यानी आठ, प्रा. गायकवाड यांनी ५, व श्री. एस्. एस्. पाटील यानी ३ ग्रंथ ग्रंथालयाला देणगीदाखल दिले- सुमारे १० हजार रु. किमतीचे विविध विषयावरील मराठी व इंग्रजी विश्वकोषही घेतले आहेत. अभ्यासाबरोबर इतर विषयाचे व चालू घडामोडींचे ज्ञान मिळावे म्हणून निरनिराळ्या विषयावरील ५० नियतकालिके व ८ वर्तमानपत्रे घेतली जातात.

ग्रंथालयातून प्रत्येक विद्यार्थ्याला २ किंवा ३ पुस्तके घरी वापरण्यासाठी दिली जातात. याशिवाय गरीब व गरजू विद्यार्थ्यांना पुस्तक रुपाने मदत करण्य साठी पुस्तक पेढी योजना सुरु केली आहे. चालू वर्षी या योजनेखाली १५० विद्यार्थ्यांना सुमारे ४ हजार रु किमतीच्या पुस्तकाचे वाटप केले. सदर योजनेतील पुस्तके वर्षभर वापरण्यास मिळतात.

# परवड

**प्रा. बाबुराव गायकवाड**

घड्याळात एक ठोका पडला. तसे शेखरने समोरच्या भिंतीवरील घड्याळाकडे पाहिले. साडेपाच वाजले होते ऑफिसमधील इतर कर्मचाऱ्यानी घरी जाण्याची तयारी चालविली होती. त्यानेही बॅग उचलली व तो बाहेर पडला. नेहमीप्रमाणें तो आज बसस्टॉपवर गेला नाही. ऑफिसमधील कर्मचाऱ्यानी बसस्टॉप भरुन गेला होता. तिकडे एक दृष्टीक्षेप टाकून तो चालायला लागला. पावलाना घराची ओढ राहिली नव्हती. पाय लुळे पडल्यासारखे त्याला वाटले. घर ऑफिसपासून चांगले एक–दीड मैल दूर होते. त्याला दोन वर्षापूर्वीची अवस्था आठवली. तेव्हा त्याला नोकरी तर कैद वाटायची.

शेखर स्वतंत्र विचारसरणीचा होता. कॉलेजमध्ये असतांना त्याने नांव गाजवलं होतं. त्या जीवनाचा मनावर परिणाम झाला होता. कॉलेज जीवनात असताना महात्मा फुले, कर्वे यांचे विचार आत्मसात केले होते. कॉलेजच्या वादविवाद स्पर्धेत 'स्त्रियांना स्वातंत्र्य द्यावे का ?' या विषयावर स्त्रियांच्या बाजूने आपली मते हिरिरीने मांडली होती. 'माझ्या वयाला साजेशा स्त्रीला जर वैधव्य प्राप्त झाले तर मी तिच्याशी लग्न करीन. माझ्या विचाराचे अनेक तरुण याठिकाणी निर्माण झाले आहेत.' शेवटच्या वाक्याचे तर विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटाने त्याचे स्वागत केले होते.

'बोलणे सोपे, पण कृतीत आणणे कठीण असते' त्याच विषयावर बोलताना रेखाने टोला दिला होता. योगायोग असा की रेखा त्याच्याच ऑफिसमध्ये आज नोकरी करीत होती. तिच्याकडे पाहिले की त्याला कॉलेजचे दिवस आठवायचे. रेखा अल्लड, चंचल व आधुनिक विचाराची होती. किरकोळ शरिराची रेखा आता आकर्षक दिसत होती. पण चेहऱ्यावर नेहमी नैराश्य. तिचे लग्न होऊन दोन वर्षे झाली होती. शेखरचेही लग्न झाले होते, पण शेखर विधुर झाला होता. नियतीने त्याच्यावर क्रूरपणे सूड उगविला होता कधीकाळीचा वादविवादातील तिचा एक भिडू असा जीवनात पराभूत झाला होता. लग्नानंतर मुलीनी कसं सदाफुलीच्या फुलासारखे नेहमी प्रफुल्लीत राहावे! पण रेखाकडे पाहिल्यास तसे वाटत नव्हते. कॉलेज मधील ओळख म्हणून की काय त्याचे व तिचे इतरांपेक्षा बरे जमायचे. इतरांना तिच्या वागण्याबद्दल अंदाज बांधता येत नव्हता. अलिकडे ऑफिसमध्ये तिच्याबद्दल बरीच चर्चा होत होती. त्याला इतरांचा राग येत होता.

एका दिवशी शेखर भाजी घेऊन भाजीमार्केट' स्टॉपवर थांबला होता. कुठूनतरी रेखा पिशवी सावरीत आली. जवळपास ओळखीचे कोणी आहे की नाही याची खात्री करुन घेत 'स्त्री जन्माची कहाणी' तिने सुरु केली.

'माझे आधुनिक विचार माझेच शत्रु झाले.' ती असे का म्हणतेय तेच शेखरला कळेना. तिचा पती नोकरीला होता हे त्याला माहित होते. सुशिक्षित

आधुनिक विचाराचा होता हे त्याला माहित होते. त्याच्याविषयी शेखरने विचारले तेव्हा ती वादविवादात हरविण्यासाठी बोलावे तशी बोलली 'पुरुष जातीवरच जायचा !' तिचे संसाराविषयीचे बोलणें ऐकून त्याला गदगदून आले. 'वर्ष होऊन गेलं. लोकं बोलतात ते खरं आहे. स्वातंत्र्य उपभोगण्याचा मी प्रयत्न करत्येय मी त्याच्यापासून घटस्फोट घेतलाय. पण इच्छिलेले स्वातंत्र्य कुठे आहे? मी नुसती मृगजळामागें धावतेय, एकटी, एकांतात होरपळतेय'.

तिची परवड ऐकून त्याला कसेतरी झाले. बोलता बोलता ती थांबली. त्याच्याकडे निरखून पहात म्हणाली 'पुरुषाला एकटं कितीही काळ राहता येतं.काहीही करता येत पण स्त्रीला जमत नाही रे ! कसले आहे स्वातंत्र्य नि कुठले हक्क मिळाले तिला ?' आपल्याही मनात काही तरी बरचस दाटून राहिले आहे असे त्याला वाटले. तिला बोलून दाखवावे का ? सभ्यपणाने वागणारा, आपल्या परिस्थितीचा जुन्या ओळखीचा फायदा घेतोय असे तर तिला वाटणार नाहीं ना ?

'रेखा, जीवनात माणसाला तत्वाप्रमाणे तंतोतंत चालता येईलच असे नाही. बोलतांना आपण तिच्या नांवाचा उच्चार केला हे त्याच्या लक्षात आलेच नाही. तिच्या चेहऱ्यावर मात्र आता प्रसन्नता दिसली. तिलाही कॉलेजचे दिवस आठवले. नकळत त्याच्याकडे आपण ओढले गेलो होतो. पण कशी कुठे चूक झाली ते कळलें नव्हते. 'तू कॉलेज मध्ये वादविवादाच्यावेळी केलेली घोषणा पूर्ण कर ना. मला आनंद होईल. आता संधी आलीय. नको त्यावेळी तुला विधुरावस्था आलीय मी कुण्या विधवेशी लग्न करायला नाही सांगत. पण एका घटस्फोटितेशी तरी लग्न करणार का? बोलतांना तिचा कंठ दाटून आला होता. साडीच्या टोकाने खाली बघत डोळे टिपीत होती. त्याला वाटले एकांतात असतों तर तिचे डोळे तरी पुसता आलें असते. तिने वर मान करताच तो म्हणाला, 'रेखा' तू तयार असशील तर माझी हरकत नाही. बोललेल्या शब्दांची परीक्षा काळाला घ्यायची असेल तर आपण तरी मागे कशाला हटावे?' रेखा खुषीत दिसली. खरे तर तो तिला धीर देण्यासाठी बोलला.

बसची वाट न बघता ते चालत फर्लांगभरवर असलेल्या गोकुळात शिरले. चहा घेताना शेखरने विचारले, 'मुलगी कुठे आहे ? तिचं काय केलस ?' त्यावर रेखा काहीच बोलली नाही. अचानक घाव बसल्याप्रमाणे ती मनांत विव्हल झाली असे त्याला वाटले. 'पण तुझी घरी वाट बघत असेल ?' तिची मनधरणी करण्यासाठी तो बोलला. त्याची उत्सुकता न वाढू देता म्हणाली, 'तिला आईकडे ठेवले आहे,' तूर्त एवढें तरी बरे झाले असे त्याला वाटले.

आता ती जीवनसाथी म्हणून एकत्र आली होती. काय झाले कुणास ठाऊक पण शेखरच्या सहवासात आल्यानंतर रेखाचा स्वभाव बराच पालटला होता. घर आणि संसार एवढीच चौकट तिने आखून घेतली होती. नोकरीच्या धावपळीमुळे तर पहिल्या नवऱ्यापासून तिला घटस्फोट घ्यावा लागला नाही. नाहीतरी मुलीनंतर तो पार वदलला होता. इतर बायका नोकऱ्या करत नाहीत का? म्हणून काय नवऱ्याने दुसऱ्या स्त्रीला घरात आणावे? सहजीवन नोकरीमुळे कमी लाभत असेलही. एवढीच उणीव होती का? कोठल्याच गोष्टीचा तिला उलघडा होत नव्हता. मुलीला मोठी करण्यासाठी कुणाचा तरी आधार हवा होता. म्हणून तर तिने शेखरशी लग्न केले. वर्षभर रेखाच्या सहवासात तो फुलला होता. पण आज ते सुख विरुन गेले होते का? त्याला व तिलाही कळत नव्हते. आठवणीच्या चक्रात शेखर घरी केव्हा पोहोचला हे त्याला कळलेच नाही.

रेखा स्वयंपाक करीत होती. निर्मला शेजारी गेली होती. त्याने बैठकीतील खोलीत रेलून घेतले

आताशी रेखाही पहिल्यासारखी आकर्षक वाटत नव्हती. नेहमी कसलातरी विचार करत असलेली रेखा चांगली देखणी होती. तिच्याकडे पाहिल्यावर तिचे लग्न झाले नसावे असे वाटायचे. कौमार्य अजूनही ओसंडत आहे असे वाटे. निर्मला तर शेजारची मुलगी खेळायला आली असे वाटायचे. रेखाला पहिल्यापासून सौंदर्याचा अभिमान वाटायचा. निर्मला बालवाडीत जायला लागली तसं रेखाला कससंच व्हायला लागलं निर्मला तिच्या पहिल्या बापाच्या तोंडवळ्यावर गेली होती. रेखा ज्याला विसरायचा प्रयत्न करायची तेच पुढे येत होते. त्यामुळेच की काय ती आताशी बरीच उदास दिसायची. शेखर बरोबर गप्पा करीत असताना असे आलेले विचार दाबून टाकण्याचा प्रयत्न करी. कालचा प्रसंग शेखरला आठवला. परवा सिनेमाला गेल्यामुळे सकाळीं उठायला उशीर झाला होता. ऑफिसला जाण्याच्या तयारीत तो असताना रेखाने निर्मलेला चड्डी घालून घेण्यासाठी पाठवले.

'बाबा, खरंच घालता येते काहो चड्डी तुम्हाला ? निर्मला लाडिकपणे म्हणाली. 'नाही, मी अगदी लहान बाळ आहे. काय ग ? रेखा, तुला माहीत नाही का मला उशीर होतोय ते. तरीही माझ्याकडेच पाठवतेस कार्टीला ! मी गेल्यावर तिचे लाड करीत बस. कुत्र्याने तोंड तासल्यागत पडलेल्या कोपऱ्यातील बुटाकडे लक्ष जाताच तो आणखीनच ओरडला, 'बुटाचे पॉलिश पण झालं नाही वाटतं अजून ?"

दुपारच्या जेवणाचा डबा बॅगमध्ये ठेवत रेखा म्हणाली 'वेणी करून तेच करणार होते. तेवढ्यात तुम्ही तयारी करुन बसलात ही. 'आजकाल समोर असलो कीच माझी कामे सुचतात तुला?, खिळ्याला टांगलेले घड्याळ घेत शेखर म्हणाला. 'निर्मलेची बालवाडीत जायचीही गडबड त्यामुळे सकाळी थोडीशी माझी धांदलच उडते.' काही तरी बोलावे म्हणून ती बोलली.

"तिला थोडा उशीर झाला तर बिघडत नाही. मला चार पाच लोकामध्ये बोलणं खावं लागतं. तुला माहीत नाही का?"शेखरचे तावातावाचे बोलणे रेखाच्या हृदयाला चिरीत होते. निर्मला त्याच्याकडे बघत होती. आईला बिलगत ती म्हणाली, 'बाबा, का ग तुझ्यावर नेहमीच रागावतात ?'

"कार्टे, मुस्काटच फोडीन असं बोलशील तर" शेखरने धाक दाखवला.

गोरीमोरी झालेली निर्मला आईचा हात घट्ट पकडीत रडण्याच्या सुरात म्हणाली, 'आई, बाबा असे का ग वागतात आमच्याशी !'

'काही नाही बाळ. तुला शाळेत जायचं ना? रेखा समजावण्याच्या सुरात म्हणाली.

'अशानं तर आमचा पाणउतारा करतेय कार्टी— एवढी पोर, म्हणत शेखर मायलेकीकडे एक सारखे डोळे वासून अधाशीपणाने पाहू लागला. निर्मलानेही डोळ्याच्या पापण्या ताणून त्याच्याकडें पाहिले. तिच्या डोळ्यात त्याला काही तरी चमकल्याचा भास झाला. इतकं निरखून तो तिला पहिल्यादाच बघत होता. निर्मलेच्या चेहऱ्यात त्याला रेखाचा चेहरा जाणवतच नव्हता. त्याला निर्मलेचा पहिला बाप जाणवू लागला. त्याला आणखीणच राग आला. रेखापासून दूर करीत म्हणाला, 'गोचडा सारखी नेहमी चिकटलेली असते.' निर्मलाने परत आईला घट्ट आवळले. पहिल्या नवऱ्या कडून घटस्फोट घेंऊन येंत असतानाही निर्मला माकडाच्या पिल्लासारखी तिच्या कडेंवर बसली होती. या गोष्टीची तिला आठवण झाली

तेव्हा तिला काही कळत नव्हते. आता ती जाणती झाली होती. शेखरची वर्तणूक बघून निर्मला म्हणाली, "खरेखुरे बाबा आपल्या मुलीला असे नाहीत ना ग करत ?आई आपले बाबा असे का ग करतात ! मिनीची आई म्हणत होतीं. तुझे खरोखरीचे बाबा भेटतात का ग ?मी म्हणाले, घरींच असतात ते- हे आपले बाबा नाहीत का ग ? " रेखाने थरथरता हात तोंडावर ठेवत

धमकावले, ‘ चूप ऽऽ असे बोलू नगे कधी ! ’ बघता बघता दोघींच्या डोळ्यातून आसवे ओघळू लागली. निर्मला रडता रडताही विचारु लागली ‘ माझे खरो–खरच दुसरे बाबा आहेत का ग ? ’ रागाने फणफण–णाऱ्या शेखरने उभ्यानेच खुर्चीत अंग झोकून दिले. घड्याळात अकरा वाजून गेले होते. निर्मलेला काय उत्तर द्यावे हे त्याला व तिला समजेना. आजही त्याच विचारात स्वतःला मांजराप्रमाणे सावरीत खुर्चीत बसून होता.


# मे. सुभाष मेडिकल स्टोअर्स

## केमिस्टस् अँड ड्रगिस्ट

**मेनरोड देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

# आमचे मराठीचे शिक्षक

**अनिल ठाकूर.**
टी. वाय्. बी. ए.

घंटेचा टोल पडला आणि सारा वर्ग हळहळला. सरांच्या चेहऱ्यावर मंद स्मिताची रेषा उमटली पुस्तक मिटून सर वर्गाबाहेर पडले, पण आम्ही मात्र सरानी आम्हाला नेलेल्या ज्ञानेश्वराच्या भुमीतून बाहेर पडू शकत नव्हतो. मराठीचा तास हा असाच आम्हाला नित्य नवा अनुभव देत होता. खरं सांगायचं तर बारावीच्या वर्गात येईपर्यंत मराठी हा शिकवायचा विषय आहे असे आम्हाला कधी वाटायचेच नाही. मराठीत काय शिकवायचे असते ?

या आमच्या कल्पनेला सरानी धक्का दिला. बारावीच्या वर्गात येण्यापूर्वीच आम्ही या सरांविषयी बरेच ऐकले होते. पण प्रत्यक्ष अध्ययन सुरु झाल्यावर उमगले की याच्याहून कितीतरी अधिक त्यांच्याजवळ होते. सराना पाहिल्यावर असे वाटत नव्हते की येथे मराठी शारदेचा दरबार भरलेला आहे.

त्यांची मध्यम देहयष्टी, विजार, बुशशर्ट हा साधाच पोषाख बघून सुरवातीलाच आम्हाला वाटले 'बर आहे वर्षभर आपल्याला पुष्कळ दंगा करावयास मिळणार' आणि त्या कल्पनेनुसार सरानी वर्गात प्रवेश करताच एका वात्रट कोपऱ्यातून आवाज आला 'मामा'. सरानी त्या दिशेला पाहून म्हटले, 'वा छान! मामा म्हटलेत. आपले नाते जवळचेच झाले. काका म्हटले असते तर अवघड गेले असते. सरांच्या आवाजातील मृदुता नि डोळयातील धार त्याच क्षणाला विजयी ठरली आणि अगदी थोडयाच कालावधीत वात्रट कोपरे तिने जिंकून घेतले.

सरांच्या दर तासाला आम्हाला ज्ञानामृताची मेजवानी मिळे. येथें ज्ञानेश्वरांची अमृतवाणीं प्राशन केली, जनाबाईबरोबर ताटीचे अभंग गाईले, तुकारामाचे बोट धरुन विठोबाशी प्रेमाचे भांडण केले. येथे शब्दांच्या कसरती पाहिल्या. अनेक शब्दांचे अर्थ अनर्थ पाहिले. अनेक कविता, कादंबऱ्या, निबंध, यांची चर्चा येथे घडली.

केशवसुत हे तर आमच्या सरांचे आवडते कवी.

'प्रातःकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा'

हे केशवसुतांचे वचन त्यानी आमच्या वर्गात आमच्या समोर ठेवले होते. सरांच्या सहवासातील त्या काळात कित्येक काव्यचरण माझ्याही ओठावर रेंगाळू लागले. सरांचे पाठांतर असामान्य होते. ज्ञानेश्वरीतील ओव्या म्हणू लागले की आम्ही सर्वजण थक्क होत असू. सरानी आम्हालाही पाठांतराचे वेड लावले. आमच्या पाठ्यपुस्तकातील कविता आमच्या पाठ होण्याच्या अगोदरच सर धडाधड म्हणून प्रत्येक ओळीन ओळीचा अर्थ आम्हाला समजाऊन देत असत. त्यांचे वैशिष्ठ्य म्हणजे कविता किंवा ज्ञानेश्वरीच्या ओव्या शिकवताना ते सहसा पुस्तक हातात घेत नसत.

या त्यांच्या व्यासंगामुळे सरांचे निबंधाचे मुद्दे ऐकताना वा चर्चा करताना 'देता किती घेशिल दो कराने' अशी आमची अवस्था होत असे परंतु व्याकरणासारखा रुक्ष विषय ही येथे रोचक झाला.

परिक्षेच्या अभ्यासाच्या निमित्तानें आम्ही सरांच्या घरी गेलो. त्या छोट्याशा घरातील तो व्यवस्थितपणा, कपाटातील तो सरस्वतीचा खजिना त्या ज्ञानभांडाराचे दर्शन घडवीत होता. पुढे अनेक वेळा मी त्या घरी गेलो पण प्रेमाचे बोल तेथे कधी सरलेच नाही. त्या घराचा उंबरठा सांगतो 'येथे एकदा येतो, तो नेहमी येतच राहातो.



# लक्षात ठेवा !

१) तीन गोष्टी मनात पेरा – सहानुभूती, उत्साह, समाधान.
२) तीन गोष्टीवर प्रेम करा – प्रामाणिकपणा, सत्य, स्वच्छता.
३) तीन गोष्टींचे कौतुक करा – बुद्धीमत्ता, सौंदर्य, संगीत.
४) तीन गोष्टीपासून सुसंस्कृत व्यक्तिमत्व बनवा – शुद्धता, पवित्रता, निर्मळ मन.
५) तीन गोष्टी कटाक्षाने पाळा – वचन, मैत्री प्रेम.
६) तीन गोष्टींचा समन्वय साधा – विचारांची संस्कारक्षमता, भावनेची कोमलता, बुद्धीचे औदार्य.
७) तीन गोष्टीवर ताबा ठेवा – मन, राग, कृपा
८) तीन गोष्टी टाळा – आळस, चुका, अशुद्ध भाषा.
९) तीन गोष्टींपासून सावध रहा – अस्तनींतला निखारा, पायातला काटा, पोटातली गाठ.
१०) तीन गोष्टीपासून दूर रहा – मद्यपान, धुम्रपान, जुगार.
११) तीन गोष्टी आचरणात ठेवा – आत्मविश्वास, स्वाभिमान, धडाडी.

**संग्राहक–कु' अलका फाटक**
टी. वाय्. बी. कॉम.

## –आधार–


जखमी हृदया
फुंकर घालशील कां ?
निराधार जरी मी
आधार देशील कां ?
वाटेवरी एकटा
सोबतीस येशील कां ?
जीवनाच्या वादळात
धीर मला देशील कां ?
गाठावया पैलतीर
हात देशील कां ?
सखे –
असा मी निष्कांचन
स्वीकार तू करशील कां ?

**–श्री. सुशिल राणे**
एस्. वाय्. बी. कॉम्.

## – जखम –

ही दुःखे
जीवनातले व्रण
पदराच्या घोळात
दडू पाहे प्राण
प्रेमाची ज्योत
हृदयातील अमृत
श्रेय द्यावे –घ्यावे
जखम ठेवून उरात

**–श्री रामकृष्ण पेडणेकर.**
टी. वाय्. बी. कॉम्.





☎ 46

# NANDAKUMAR L. GHATE

*Fish Merchant & Commission Agent*

AT & POST : DEVGAD
TALUKA : DEVGAD
DIST : SINDHUDURG 416613

—हार्दीक शुभेच्छा—

# गोगटे बंधु

**जामसंडे**

# परदेसी

—कु. सुरेखा शिर्के
टी वाय्. बी. ए.

रश्मी कॉटवर झोपली होती. पण झोपली होती म्हणण्यापेक्षा डॉक्टरानी जबरदस्तीने झोपविले होते. गुंगीच्या राज्यात ठेऊन ते हळूच निघून गेले होते.

कालच रश्मीच्या शेजारच्या कॉटवर एक नवीन चौदा-पंधरा वर्षांचा मुलगा आला होता. कुठल्याशा गंभीर अपघातातून नशिबाने वाचला होता. ते संपूर्ण वार्ड, सगळ्या कॉटस् जखमानी वेदनानी मुक रुदन करीत होत्या. त्या मुलाने आपल्या जवळच्या छोटया ट्रान्झीस्टरचे बटन खटकन दाबले. आणि "आजा रे परदेसी, मे तो कबसे खडी इस पार' या ओळी विरही व्याकुळता घेऊन आजूबाजूला भरुन राहिल्या.

रश्मीच्या कानावरही त्या ओळी आदळल्या, रश्मी बेचैन झाली. गुंगीचा अंमल संपला आणि विचाराच्या भोवऱ्यात रश्मी गिरक्या घेऊ लागली. तिने आपले तोंड फिरवले. तिच्या टपोऱ्या डोळ्यातून आसवांचा पूर वाहू लागला. ती उदासपणे शेजारच्या खिडकीतून बाहेर पाहू लागली ती खिडकी रश्मीचे अश्रु ओळखत होती, आजच नव्हे तर गेले कित्येक दिवस अन् रात्र! या ओळी ऐकल्या की रश्मी अशीच बेचैन व्हायची. तिला याद यायची त्या दोन वर्षांची, त्याची आणि नंतर तिच्या मनावर उदासिनतेचे जडभारी कवच हळूच यायचं, आताही तसंच घडल. रश्मी आताही समोरच्या खिडकीतून बाहेर पाहात होती. मोहमयी जगाच्या निसर्गाच्या हिरवेपणाच्या सौंदर्याचे अतृप्तपणे रसपान करीत होती. अचानक त्याची झलक तिला त्या निसर्गातून जाणवू लागली. तिचे दुःख पुन्हा पुन्हा उफाळून येऊ लागले. ते हिरवे सौंदर्य तिला असह्य झाले. तिने आपले डोळे दुःखातिशयाने गच्च मिटून घेतले.

'काय रश्मी बर वाटतय ना ? "डॉक्टरानी आत शिरता शिरता विचारले. रश्मीच्या ओठावर विसंगत हास्य पसरले. ते हास्यच बरचस बोलून गेल. जेव्हा शब्द पकडता येत नाहीत तेव्हा हास्य बरचस बोलून जातात डॉक्टरानी रश्मीच्या वेदना ओळखल्या. ते हळुवारपणे म्हणाले, 'रश्मी असं नाही करायचं ! लवकरच बर होशील तू !" हलकेच तिचे सांत्वन करीत ते निघून गेले. रश्मी ते शब्द आठवीत खिडकीतून क्षितीजाशी ओळख पटवीत राहिली. बाहेरच्या अथांग निळ्या आकाशाकडे पाहाताना तिला वाटले ते आपल्या सहस्त्र नयनानी आपणाला खुणावत आहे. लवकरच ये म्हणते आहे.

'खरच तिथे देवाचे घर आहे. या सर्व वेदनातून मुक्त करायला पाहात आहे. पण डॉक्टर काय म्हणाले? खरच आपण बरे होऊ का ? छे ! उगाचच डॉक्टरांचे गोड शब्द.' गोड शब्द आणि तिला आठवल अशाच मोहमयी शब्दात आपण एकदा गुरफटलो होतो. त्या आठवणी सरशी ती खिन्न झाली. तिच्या समोरच्या निळ्या आकाशात अनेक काळे–हिरवे रंग मिसळून गेले

पांढरी शुभ्र मोठ्या केशरी काठाची साडी, केशरी ब्लाऊज, कुंकू, केशरी बांगड्या अशा वेषभूषेत रश्मी मोठ्या आनंदाने आज समुद्रावर फिरायला गेली होती. तिचे लोभसवाणे सौंदर्य आज अधिकच उठावदार बनले होते. समुद्राच्या लाटा खळखळत किनाऱ्याला गुपीत सांगत होत्या. सूर्य आपल्याकडील विविध रंग उधळून रंगपंचमी खेळत होता. निसर्गाचे वेड असणारी रश्मी ही त्याच्या खेळात सहभागी झाली होती. आणि अचानक कुठूनसे स्वर आले "आजारे परदेशी — — — — — — — — —." रश्मीची भावसमाधी मोडली. तिचे आवडते गीत ऐकण्यास ती आतुरतेने तिकडे वळली. तिची पहिली भेट, केतन ! हो केतनच त्याचे नांव ! त्या पहिल्या भेटीतच पुढची भेट निश्चित झाली. दोघांच्या मनाने एकच भावना जोपासली होती, ती म्हणजे 'प्रिती. निसर्गाचे बदलते रंग त्यांच्या मनाला मोहवीत होते. रश्मी सुखांने मोहरत होती तो परदेशी तिच्या आयुष्यात सुख होता. काळ पुढे सरकत होता.

आणि तीं संध्याकाळ आली होती. बराच वेळ झाला पण अजून केतन आला नव्हता. सूर्य हळू – हळू पश्चिमेकडे सरकत होता. पण रश्मी आज त्याच्याकडे लक्ष देत नव्हती. तिचे मन केतनची वाट पहाण्यात गुंग झाले होते. डोळे आतुरले होते. आणि अंतःकरणात केतनचे राग घुमत होते. "रश्मी आज तू माझ्या आयुष्यात आलीस ही साथ कायम देशील ना?"रश्मीने ते तर केव्हाच मान्य केले होते. पण आज अजूनही केतन आला नव्हता. रात्र चोर पावलांनी सरकत येत होती. रश्मी भितीने थरारली, उदास मनस्थितीत ती घरी आली.

दुसऱ्या दिवशी ही केतन आला नाही. पण रश्मीच्या नांवावरच एक मोठे पाकिट पोस्टाने आले रश्मीने अधीरतेने ते पत्र फोडले त्यामधली अक्षरे तिच्या संवेदना गोठवून गेली. तिचे हृदय करपवून टाकणारे केतनचे शब्द तिच्या भोवती भोवती फेर धरुन विचित्र–पणे नाचू लागले. त्याने लिहिले होते. "रश्मी तू मला विसरून जा. कारण माझे लग्न ठरलय. आईवडीलांच्या इच्छेला मान देणे माझे कर्तव्य आहे. माझी चूक मला कबूल आहे. पण माझा नाईलाज आहे. तू विसरुन जा मला - - - - - - - - -"

'रश्मी काय बरे वाटतय' ? डॉक्टर आले होते. स्मृतीच्या गडद वेटोळ्यातुन बाहेर पडत रश्मीने एक क्षीण हास्य केले. तिचे फिकट ओठ अधिकच फिकट झाले- थोड्या वेळात डॉक्टरही निघून गेले. बर वाटलय ना ? बर वाटेल तुला. रोज तीच मलमपट्टी. माझी जखम फक्त शरिराची नाही डॉक्टर, तर मनाची ही आहे. रक्तक्षय कधी बरा होणार नाही हे मला ठाऊक आहे. आणि बरं होणार तरी कुणासाठी ? सगळ्या आयुष्याचा चोळामोळा झाला. मनाचे छिन्नविच्छिन्न तुकडे झाले. मग जगायच कुणासाठी ? ज्याला आपलं प्रेम दिलं मन् दिलं त्यानच ठोकरलं. पण तो मला एकदा तरी भेटला पाहिजे होता. छे अजूनही विसरु शकत नाही रे तुला- - - - - -

आजचा दिवस मोठा विचित्र होता. आकाश ढगाळलं होतं. वारा जणू कुठे पळून गेला होता. सूर्याची धुसर किरणे खिडकीतून रश्मीच्या कॉटवर आली होती. पण रश्मी अजून झोपूनच होती. डॉक्टर आत येता येता म्हणाले,' काय रश्मी कसं वाटतयं !' पण रश्मी काही बोलली नाही. डॉक्टर पुढे आले. त्यानी रश्मीच्या थंड कपाळावर हात ठेवला. ते समजले होते. शेजारच्या मुलाने नुकतेच फिल्म संगीत लावले होते. दर्दभरा आवाज शब्द फेकत होता. 'आजा रे परदेशी मैं तो कबसे खडी इस पार–' पण ते स्वर ऐकून बेचैन व्हायला रश्मी कुठे होती. ती तर केव्हाच फार दूर क्षितीजापलीकडे गेली होती. आकाशातल्या लक्षावधी ताऱ्यांकडे तिचा आत्मा झेपावला होता.

सर्व प्रकारची देशी–विदेशी औषधे
मिळण्याचे ठिकाण

**पाध्ये मेडिकल स्टोअर्स**

ग्रा. पंचायत मार्केट, कणकवली
जि. सिंधुदुर्ग

हार्डवेअर, इलेक्ट्रीकल मशिनरी
व स्पेअरपार्टस् विक्रेते

**वालावलकर आणि कंपनी**
**मेनरोड, कणकवली.**

आधुनिक फॅशनचा
बादशहा–

**स्टाईलकिंग टेलर्स**
**देवगड**

किराणा व भुसार मालाचे व्यापारी
व ट्रान्सपोर्ट कॉन्ट्रॅक्टर

**धोंडु रामचंद्रशेठ पारकर**
हिंदळे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

## देवगड अर्बन को–ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड,

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

नोंदणी क्रमांक ७३४८ ☎ ३८

**आमच्या बचत योजना**

सेव्हिंग्ज, मुदत बंद ठेवी, रिकरींग डिपॉझिट,
दैनंदिन पिग्मी बचत योजना, धनवर्धिनी, कॅशसर्टिफिकेटस्
मासिक व्याज ठेव योजना, त्रैमासीक व्याज ठेव योजना

**वैशिष्टये–**

१) रु ३०,०००/– (रु. तीस हजार) पर्यंतचे प्रत्येक ठेवखाते विमा सुरक्षित आहे.
२) कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेपेक्षा ठेवीवर १ टक्का व्याजाचा दर जास्त.
३) ऑडिट वर्ग 'अ'

सोईस्कर कामकाजाच्या वेळा–
सोमवार ते शुक्रवार–सकाळी ८–३० ते ११–३० दुपारी ३–०० ते ४-३०
फक्त शनिवार सकाळी ८-३० ते १० ४५.

**श्री. सु. रा. रसाळ**
चेअरमन



।। बिना सहकार नही उद्धार ।।

**" देवगड महाविद्यालय कला व वाणिज्य" ला**

**आमुच्या हार्दीक शुभेच्छा !**

पी /११७५ दि. ३/१/१९५०

## देवगड फिशरमेन्स को–ऑप. सोसायटी लि.

**मु. पो. ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

संस्थेचे बाजारपेठ देवगड येथील 'मच्छिमार साधनांचे दुकान'
मधुनच मच्छिमार साधने खरेदी करा.

**' मच्छिमार बांधवांचा सर्वांगीण विकास हेच आमुचे ध्येय.'**

| | | |
|---|---|---|
| **एस्. के. मोरे** | **आर. व्ही. चिंदरकर** | **बी. डी. परब** |
| सचिव | व्हा. चेअरमन | चेअरमन |

श्री भवानी हमाल व मजूर सहकारी संस्था, मर्यादित

११८–१९, रुईकर बिल्डिंग, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर.

जे. वाय. सरमळकर
चेअरमन



प्रविण वी. विलणकर

प्राऊन्स ॲन्ड फिश सप्लायर्स

रत्नागिरी

हार्दिक शुभेच्छा !

**अशोक इंडस्ट्री**

**देवगड**

राईस, फ्लोअर, सॉ मिल ॲन्ड

आयर्न वर्कस्

**प्रोप्रा. मेस्त्री बंधु**

चमचमीत नाश्त्यासाठी—

**हॉटेल समाधान**

बाजारपेठ कणकवली

हार्दीक शुभेच्छा !

धान्य, किराणा, स्टेशनरी

व देशी औषधांचे व्यापारी

**मे. वळंजु ब्रदर्स**

**मिठबांव**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

सर्व प्रकारचे कापड व

रेडीमेड कपडे

योग्य दरात मिळण्याचे ठिकाण

**शिवकृपा कटपीस सेंटर**

**जामसंडे-देवगड**

'अरे यावर्षी आपले पदवीचे शेवटचे वर्ष, मग पुढे काय करायचे ?'

'नोकरी कि व्यवसाय —!

'छे बुवा या नोकरीत काय दम नाही '

'मग व्यवसाय करायचा'

'पण कसला'

'कसला म्हणजे' अरे, आज आपल्याकडे कुठला धंदा फॉर्मात आहे.

'खटवीचा' म्हणजे मच्छिमारीचाच ना !

'हो तर, अरे मत्स्योद्योग हा जगामध्ये शेती खालोखाल दोन नंबरचा व्यवसाय झालेला आहे. जगातील वाढत्या लोक संख्येला पुरक अन्न पुरविण्याची जबाबदारी या व्याव–सायिकांवर पडते त्यामुळे मत्स्योत्पादनाला जगात मोठया प्रमाणावर मागणी आहे. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाच्या या धंद्यासाठी विविध योजना आहेत असे कळते 'पण त्याची कल्पना कोण देणार.

कोकणांतील सुविद्य तरुणानी मत्स्योद्योगा संबंधी माहिती घेण्यासाठी आम-च्याशी संपर्क साधा, आपण या धंद्यात उतरा, असे आमचे आवाहन आहे.

## तारामुंबरी सहकारी मच्छी व्यावसायिक संस्था मर्यादित

मु. पो. तारामुंबरी ता. देवगड, (फोन नंबर ४२)

सिंधुदुर्ग जिल्हातील मच्छिमारांच्या विकासार्थ झटणारी ऑडीट 'अ' वर्गातील

एकमेव सहकारी संस्था

| संगेश ना. कुबल | लक्ष्मण य. कोयंडे | मुरलीधर ल. जोशी |
|---|---|---|
| व्यवस्थापक | व्हाइस चेअरमन | संस्थापक व चेअरमन |

॥ बिना सहकार नही उद्धार ॥

# देवगड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लिमिटेड

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

नियंत्रित कापडाचा पुरवठा, शेतीसाठी रासायनिक खते,
कीटनाशक औषधे, दारू सामान, लोखंडी
सामान इत्यादींचा पुरवठा करणारी
एकमेव संस्था.

हापूस आंबा व इतर फळझाडांसाठी रॅलीमिल
व संपूर्णा खते वापरुन भरघोस पिक मिळवा !
जिल्हयातील सर्वाधिक खते विकणारी एकमेव संस्था.
आमचेकडे पन्हाळीपत्रे व कलमांवर फवारण्याची किटकनाशक
औषधे मिळतील.

**रा. रा. खानविलकर**
मॅनेजर

**र. य. राणे**
चेअरमन

# शिकार

**कु. अलका फाटक**
टी. वाय. बी. कॉम.

"अजून विचार कर, वेळ टळून गेलेली नाही ,, मिलींद आपल्या परीने प्रतिभाला समजावून सांगत होता.

"अरे मी सर्वतोपरी विचार तुझ्या प्रेमात पडा-यच्या अगोदर केला आहे. मला लंगड्या प्रवीणशी संसार करावयाचा नाही. मला काही भावना नाहीत का ? संसाराची स्वप्ने नाहीत का ? जरी मी लग्न झालेली एका जिवंत नवऱ्याची, प्रवीणची पत्नी असले तरी तो मला नको आहे, तूच हवा आहेस. माझ्याशी संसार करण्याचे तू वचन दिले आहेस."

"मी लंगड्या प्रवीणची पत्नी म्हणून मिरवू ? नाही, ते कदापिही शक्य नाही. उद्या आपण येथून जळगावला पळून जायचे आहे." प्रतिभा मिलींदला सांगत होती.

मिलींद घोरपडे व प्रवीण खानविलकर लहानपणा-पासूनचे जिगरी दोस्त, बालमित्र, व वर्गमित्र होते आणि सुदैवाने दोघानाही एकाच शहरात नोकरी मिळाली होती. प्रवीण टाटा कंपनीत होता तर मिलींद विमा कंपनीत होता. प्रवीण जेथे राहात होता तेथेच शेजारी राहाणारी प्रतिभा करमरकर त्याचे प्रसन्न व्यक्तिमत्व खिलाडूवृत्ती, उंची याबर बेहद्द खूश होती. खिलाडूवृत्ती मुळे ती एकत्र आली. त्यांची दररोज निरनिराळ्या विष-यावर चर्चा होत असे. त्यांच्या या स्नेहाचे रुपांतर प्रेमात झाले आणि एके दिवशी लग्न होऊन त्यांनी संसारात पदार्पण केले. यशस्वी संसार कसा करायचा ? जीवन कसं जगायचे ? याची स्वप्न रंगवत असत. दोघांनीही एकमेकासाठी जगायचे ठरविले होते. सुखी जीवन म्हणून जग आपल्याकडे बोट दाखविल अशाप्रकारे जीवन जगायचे, फुलवायच अशी अनेक स्वप्न रंगविली होती. आणि त्यातच दुग्धशर्करा योग म्हणजे प्रतिभाला मिलिंद घोरपडेच्या ऑफिसमध्ये क्लार्कची नोकरी मिळाली.

प्रतिभा–प्रवीणच जीवन फुलू लागल होत. त्यांच्या ओंजळीत सुखाची घागर रिकामी होत होती आणि याच घागरीवर दैवाने क्रूरतेने लाथ उगारली होती. एके दिवशी प्रवीण ऑफिसमधून येत असताना त्याच्या स्कूटरला वाटेत अपघात होऊन प्रवीण रस्त्या-वर बेशुद्ध पडला. त्याला लोकानी नजिकच्या हॉस्पिटल मध्ये दाखल केले. तो शुद्धीवर आला तेव्हा त्याला कळून चुकले की आपला एक पाय व दोन्ही हात कोपरापासून नाहीत. आपण अधु झालो, जीवनात अर्थ उरलेला नाही. परंतु प्रवीणच्या खंतेवर प्रतिभाने फुंकर घातली होती.

प्रवीण विचार करायचा की, आपल्या लग्नाला जेमतेम दोन वर्षे झाली. किती स्वप्ने होती आपली संसाराबद्दल पण ती सारीपाटाच्या सोंगट्याप्रमाणें उधळली गेली. प्रवीणच्या अशा नाजूक मनस्थितीत

प्रतिभा त्याला धीर देत होती. ती त्याला सांगे, 'प्रवीण, काही काळजी करु नकोस. मी नेटाने संसार करीन. तू घरी आरामात रहा. सुखाच्या गोधडीला दुःखाची झालर असायचीच, हे काही खोटे नाही माझी नोकरी आहे त्यावर आपला चरितार्थ चालवू. मी तुझ्यासाठी एक बाई ठेवीन, तुला भरवायला, फिरायला नेण्यासाठी आणि मी घरी आले की मी करीन तुझी सेवा."

प्रवीणची हॉस्पिटलमधून सुटका झाली व तो घरी आला. त्याच्या सेवाशुश्रुषेसाठी सुमती नावाच्या पन्नाशीच्या बाईला ठेवण्यात आले. ती प्रवीणला मुलाप्रमाणे जपत असे. त्याला कारणही तसेच होते. तिचा मुलगा राजन तिला विचारत नव्हता. तिला दुसरे कोणीच नव्हते. सुमतीने प्रवीणला लळा लावला होता. ती प्रेमभराने बाळ राजू म्हणे आणि प्रवीणही मातृवात्सल्याने आई म्हणून हाक मारी.

प्रतिभाची नोकरी व्यवस्थित चालली होती. परंतु दिवसेन दिवस तिची प्रवीणबद्दलची ओढ कमी होऊन प्रवीणचा अविवाहीत मित्र मिलींद बद्दलची आसक्ती वाढत होती तिने आपले सर्वस्व मिलींदला द्यावयाचे कबुल केले. प्रवीणला या भयाण नाट्याची कल्पना नव्हती. सुमतीस उद्या प्रतिभा मिलींद बरोबर जळगावला पळून जाणार या गोष्टीचा सुगावा लागला होता.

त्यादिवशी सायंकाळची गोष्ट. सुमती प्रवीणला घेऊन वाळूवर फिरायला गेली होती. सुमती प्रवीणला गोष्ट सांगत होती, एका धुर्त कोल्हयाची व लंगड्या दुबळ्या सिंहाची. या गोष्टीपासून सत्य परिस्थितीची जाणीव प्रवीणला करून द्यावयाची होती. सुमतीने गोष्टीस सुरुवात केली–

एकदा काय झाले, एका जंगलात सिहाने शिकार करुन एका हरणास पकडले. शिकार मिळाली परंतु तो आपला पुढचा व पाठचा असे दोन पाय गमावून बसला. हरण थोड्याच अंतरावर मरुन पडले होते. त्याला तिथपर्यंत जाता येईना. इतक्यात त्याठिकाणी धूर्त कोल्हा आला त्याला सिंहाने सांगितले की त्या ठिकाणी माझी शिकार पडली आहे. मी शिकारीच्या प्रयत्नात दोन पाय गमावले. तेव्हा ती शिकार मला आणून दे. सिंहाच्या या दुबळेपणाचा फायदा कोल्हयाने घ्यावयाचे ठरविले, आणि तो ती शिकार स्वतःच घेवून जाऊ लागला तर मी काय सांगत होते, जरी सिंह जंगलचा राजा असला तरी लंगडा सिंह श्रेष्ठ की धूर्त कोल्हा श्रेष्ठ ते सांग. माझ्या मते कोल्हा.'

ह्या वेळेपर्यंत ती घरी आली होती. प्रवीण सुमतीला सांगत होता, " जरी सिंह लंगडा असला तरी सिंहच श्रेष्ठ." यावेळेस प्रतिभा मिलींद सह घरी आली होती. ती दोघे उद्या पळून जायचे मनोरे रचीत होती. प्रवीण–सुमतीचा वाद ऐकून मिलींदने विचारले होते कसला वाद. त्यासाठी पुन्हा त्या गोष्टीची पुनरावृत्ती ऐकवली गेली. आणि सिंह श्रेष्ठ का कोल्हा श्रेष्ठ या वादाचे उत्तर मिलींदने दिले. तो म्हणाला, 'या गोष्टीत कोल्हा श्रेष्ठ कारण सिंह जरी जंगलचा राजा असला तरी लंगडेपणामुळे त्याचे जीवन व्यर्थ आहे.'

सुमतीची ही गोष्ट सांगण्या मागचा उद्देश कळला होता, मतितार्थ ही मिलींदला कळून चूकला होता. मिलींद प्रवीणचा निरोप घेण्यासाठी आला होता. त्याने प्रवीणला सांगितले, 'माझी बदली जळगावला झाली आणि मी उद्या तिकडे हजर होण्यासाठी येथून निघणार.' चहा–पाणी आटोपून मिलींद निघून गेला.

दुसऱ्या दिवशी मिलींद प्रतिभासह जळगावला निघून जातो. प्रतिभा जाताना प्रवीणच्या टेबलवर चिठ्ठीं ठेऊन निघून गेली. त्यात तिने लिहिलेले

असते.

" प्रिय प्रवीण,

प्रिय या शब्दाला आता काही अर्थ नाही, कारण तुला मी सोडून जात आहे. तुझ्यासारख्या लंगड्या, थोटयाशी संसार करण्याची माझी इच्छा नाही. मी मिलींद बरोबर नव्याने संसार थाटणार आहे तेव्हा प्लीज यात तू विष कालवू नकोस ही तुला कळकळीची विनंती आहे. अच्छा.

कळावे,
प्रतिभा

ज्यावेळी प्रवीण चिठ्ठी वाचतो तेव्हा त्याला कळून चुकते की आपली शिकार मिलींदला मिळाली आई उर्फ सुमतीने सांगितलेल्या गोष्टीतील धूर्त कोल्हा लंगड्या सिंहा पेक्षा श्रेष्ठ कसा ?




। श्री गांगेश्वर प्रसन्न ।।

सौंदर्य प्रसाधने, स्टेशनरी व कटलरी सामान, जेन्टस् फॅन्सी चप्पल तसेच आयुर्वेदीक औषधे
**योग्य भावात मिळण्याचें ठिकाण**

**सौभाग्य वस्तु भांडार**
**बाजारपेठ देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

प्रो. सुधीर दहीबांवकर

**रुबाबदार व आकर्षक व्यक्तिमत्वासाठी–**

**टेलर सिलेक्शन**
**देवगड**
**जेन्टस् स्पेशालिस्ट**

प्रो. पवार बंधु.

डोळ्यातल्या अश्रुत
    तरंगत राहातात
विझत चाललेले
    दूरचे दिवे----
आपणही अंधारयात्री
    विझणाऱ्या क्षीण नेत्री
कसे तेज देतील
    पहाटेचे काजवे
नित्याच्या वेदना
    नित्याचे गर्भारपण
जीवंत मरण
    नित्य नवे ---
वेढून टाकणाऱ्या
    या साऱ्या पुरातून
मुक्त व्हायला
    मरण हवे----

**–संजय पाटणकर**

# हिंदोल

शब्द होऊन मीच माझ्या अक्षराना शोधीत गेले
अन् नभाचे दान त्याच्या पापणीस मागून आले.
सान्डता मल्हार डोळा पूर भरता सान झाले
आसवांच्या चौकटीला रात्रभर लगटून गेले
चन्द्र अर्धा सोनपंखी ओठावरी घेऊन आले.
पाकळ्यांची सांज होता मोकळे आभाळ प्याले.
मोगरा अन् वेचता तू चान्दणीचा शब्द झाले
स्वप्न पंख पाखरांना लोचनी माखून आले.
या क्षणांना आळविता मीं मला शोधून गेले
गन्धवतीच्या फान्दीच्या अन् हालता हिन्दोल झाले.

**–कु. नीता नाबर**

# राखीबंधन

–शिवप्रसाद पेडणेकर
एस्. वाय्. बी. ए.

डींग ऽऽऽ डाँग ऽऽ - - - -

" कोण मरायला आला एवढ्या रात्रौ लोकांना त्रास देऊन हौस पुरी झाली नाही ? रात्री पण येतात मरायला " - - - -

टिक् टिक् ऽऽ टिक् टिक् ऽऽ - - - -

" अरे बाबा थांब ! उद्या शेवटचा पेपर आहे हे तरी लक्षात आहे का ? ही परीक्षा झाली मग रात्रभर बोंब मारीत बसलात तरी तुम्हाला ओरडायला कोणाच्या बापाची छाती होणार नाही - - - - "

दादा ऽऽऽ दादा ऽऽ - - - -

अरेच्या ! मला दादा म्हणणारा कोणता जीव जन्माला आलाय ? काय अचाट प्राणी दिसतोय ! अरे, पण मलाच कोण हांक मारतय - - - ? छे ! आपल्याला तर कोणीच दादा म्हणत नाही. आणि - - - -

" दादा ऽऽऽ दादा ऽऽ दार उघड ना ! " छे ! मी काय पहातोय हे ! मी - - - जागा तर आहे ना ? - - -

दारात अेक १७ – १८ वर्षांची सुंदर मुलगी बेचैन मनःस्थितीत भावपूर्ण नजरेने माझ्याकडे कसल्यातरी अपेक्षेने पहात होती. तिच्या कुरळ्या काळ्याभोर बटा गोऱ्या गालावर शांतपणे डुलत होत्या तिचे लालबुंद ओठ आणि काळेभोर डोळे कोणाच्याही सहज डोळ्यात भरतील असे होते. तिच्या त्या सौंदर्याकडे पाहून मला आनंद तर झाला नाहीच. पण धक्काच बसला - - -
तिच्या गळ्यात मंगळसूत्र नव्हतं आणि - - -

मला एकदम घेरी आल्यासारख वाटू लागलं स्वतःला कसातरी सावरीत मी तिच्याकडे प्रश्नार्थक नजरेने पाहू लागलो - - -

" दादा मला ओळखल नाहीस - - - ?
मी - - - तुझी छोटी - - - बहीण - -
पिंकी - - - तुला - - - ती जांभळं आठवतात ?

माझ्या होकारार्थी डोळ्यातून आलेले अश्रू पाहून तिने एकदम हंबरडा फोडला - - - " दादा मला ओळखलस ना ? - - -

माझं लहाणपण फार गरिबीत गेलं खूप हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. वडील मोलमजूरी करीत आई लोकांची भांडीकुंडी करी. मी आणि आम्ही दोन भावंडं छोटा मिलिंद पहिलीत होता आणि मी सहावीत घरच्या गरिबीमुळे मला घरोघर पेपर विकावे लागत, महिना अखेरी १० – १५ रुपये मिळत. हे पेपर विकताना मला खूप चांगले वाईट अनुभव आले. कधी कधी मी स्वतःवरच वैतागायचो. पण करणार काय ? पैशासाठी ते काम करावे लागे.

राखी पौर्णिमेचा दिवस, आमच्या घरी शांतपणेच उगवला. मी दररोज प्रमाणे उठून पेपरवाल्याकडे पेपर आणायला गेलो. पेपरच्या मुखपृष्ठावर एक गोंडस मुलगी आपल्या लाडक्या भावाच्या हातात राखी बांधत असलेले चित्र होते मी त्या चित्राकडे बराच वेळ वेड्या सारखा पहात होतो. आपल्याला छोटी बहीण नाही याचे मला त्यावेळी फार दुःख झाले. मी सारे पेपर घेऊन सरळ घरीच आलो. आणि आई जवळ जाऊन खूप रडू लागलो. आईने मला खूप समजाविले

मी दारोदार पेपर घ्या ऽऽ पेपर घ्या ऽऽ – – – करत ओरडत फिरु लागलो .सर्व पेपर संपले फक्त दोनच शिल्लक राहीले. आता हे दोन पेपर घ्यायचे आणि घरी जायचे इतक्यात समोरून एक जांभूळ विकणारी बाई आली. काळी भोर जांभळं मला फार आवडली. मी १० पैशाची घेतली आणि पुन्हा ओरडत जाऊलागलो – – – – – – – – दादा ऽऽ दादा ऽऽ – – – – – – – – –

मी मागे वळून पाहिले. एक ६ – ७ वर्षाची गोजीर – वाणी मुलगी आपल्या दारातून माझ्याकडे पाहून हाक मारत होती. मी काहीवेळ तिच्याकडे पहातच राहिलो. आणि नंतर माझी पाऊले आपोआप त्या घराकडे वळली.

मी जवळ जाताच माझ्या हाताला विळखा घालून ती रडू लागली. मला काय प्रकार चालला आहे हे काहीच कळेना. तिची आई डोळयाला पदर लावीत घरा तून येत होती.

" दादा ऽऽ इतके दिवस कुठे होता रे ऽऽ ? मला तुझी खूप आठवण यायची रे ऽऽ – – – – – – – – '

" बाळ, आत ये – – – – – – – ! "

मी आत गेलो. तिच्या आईने मला एका पाटावर बसायला सांगितले.

" बाळ तुझं नांव काय ?

" राजा – – – – – "

" कुठे गेला होतास ? "

" पेपर विकायला – – – – – "

" काय ऽ ? "

मला तिने एकदम उराशी कवटाळले. माझ्या पाठीवरून हात फिरवीत माझी सारी चौकशी केली.

" पिंकी हा बघ तुझा दादा – – – – " पिंकीच्या आईच्या डोळयांतून अश्रूंचे पाट वाहत होते.

पिंकीचा लाडका भाऊ- - - दादा याच दिवशी पिंकीला आणि साऱ्यांना सोडून दूर - - - - खूप दूरा परत कधीही येणार नाही अशा ठिकाणी गेला होत पिंकीच्या हातातली राखी अधांतरी राहिली होती पिंकी आईला दररोज विचारायची " आई दादा केव्हा येणार ?" आईने सांगायच, " पुढच्या राखी पौणिमेला येईल - - - - - - - " बिचारी इवलीशी पिंकी वर्षभर वाट पहात राहिली होती.

" दादा आत ये ना ऽ ,,

पिंकीने खूप नट्टा पट्टा केला. मोठया फुलांचा हिरवा फ्रॉक तिला छानच दिसत होता इवल्याशा लाल पाट- भोवती पिंकीने स्वतः रांगोळी काढली होती. इवल्याशा समईच्या प्रकाशाने सारे घर आनंदाने न्हाऊन निघाले होते. उदबत्तीचा सुगंध खोल्या खोल्यातून दरवळत होता

मी निमुटपणे पाटावर बसलो, पिंकी आज खूपच आनंदात होती. तिला आज भाऊ भेटला ना! माझ्या हातात तिने राखी बांधली. माझ्या डोळयातून आनंदाश्रू आले. मी आणलेली जांभळे तिच्या हातात दिली आणि तिच्याकडे पाहिलं. तिचे जांभळा सारखे काळे डोळे पाहून हसू आलं – – –

मी आनंदाने घरी आलो, आणि आईला सर्व काही सांगितले. मी दररोज पिंकीकडे जांभळं घेऊन जायचो तिला जांभळे खूप आवडायची.

मी पेपर विकले, पैसे मिळविले, आणि त्याहूनही अधिक मिळवलं ती माझी बहीण पिंकी – – –

आज मला माझं घर, आई, वडील, भाऊ साऱ्यांना सोडून ७ - ८ वर्षे झाली मागच्या कसल्याच गोष्टीचा मी विचार केला नाही. स्वतःच्या कर्तृत्वावर मी चार पैसे मिळविले. स्वतःच आजपर्यंत शिक्षण नोकरी सांभाळून केल मी मागे घडलेल्या कोणत्याच घटनेचा विचार केला नाही, की कोणाची आठवण ही काढली नाही. समाज त कसे वागायचे हे सर्वात महत्वाचे शिक्षण माझ्या आई वडिलांनी दिले. मी त्यांचे उपकार आयुष्यात विसरणार नाही.

मी आज या ठिकाणी मानाचे स्थान मिळवले आहे. एक प्रतीष्ठीत व्यक्ती म्हणून लोक माझ्याकडे

## वेडापिसा

अंधारी मी एकटा
शोधतो माझ्या प्रितफुला
शिरी विशाल अंबर
पाहाता भरे ऊर.
साठवित जगतीचे प्रेम
गमे जवळी आले व्योम.
उदास मी होता
झुंजतो मनाशी.
भोवती लोक सारे
येती जरी धुंद वारे.
फुलणाऱ्या-कुडणाऱ्या
स्पर्श कैसा करु ?
माझ्या वेड्या मनाचा
बावळाच वेष.
तालात बरळे
होऊन मी वेडापिसा

— अनंत जाधव
टी. वाय. बी. ए.


हार्दिक शुभेच्छा !

अे. अे. आगा आणि कं.
हिंदळे, ता. देवगड

किराणा व भुसारी मालाचे व्यापारी



हार्दिक शुभेच्छा !

किराणा व भुसारी मालाचे व्यापारी

मे. राणे ब्रदर्स
मु. पो. बापर्डे
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

बोट दाखवतात. माझा सल्ला मागण्या साठी माझ्या मित्रांपासून शहरातल्या सावकारा पर्यंतचे सारेजण येतात. माझी पायरी ओळखून मी आज समाजात वावरत आहे. प्रत्येकांशी त्या नात्याने वागत आलो आणि तसाच वागत रहाणार. - - -

माझ्या डोळ्यापुढे सारा इतिहास उभा राहिला

" अग, तू बाहेरच उभी आहेस,
ये ना, आत बस ये न ऽ - - - - "

" दादा मी चुकले रे ऽऽ मला क्षमा कर. माझ्या हातून फार मोठ गुन्हा झाला - - - - - त्याला कारणीभूत मीच - — — — दादा ऽ मला ही शेवटची एकच भीक वाढ - - - - - - मी हे तुझे उपकार केव्हा विसरण र नांह — — — - - -

मला समाजात जगायचे आहे रे ऽऽ पुन्हा असा कधीच गुन्ह करणार नाही. अगदी तुझी शपथ - - - मला तुझा विश्वास होता म्हणूनच मी तुझ्याकडे आले. - - - - - - मला घरात खूप मार झोड केली शेन्टी शोधत पत्ता काढत तुझ्याकडे आलें - - - - - - - - —

दादा :: मला - — - - - हॉस्पिटल मध्ये - - - - घेऊन चल - - - - -तुझे उपकार होतील - - - -
मी तुझ्या पाया पडते - - - - -

काय करु ? - - - - पिंकी माझ्याकडे इतक्या विश्वासाने मदती साठी आली आणि - - - - - पण असल्या फालतु मदतीची तिने माझ्याकडून अपेक्षा करावी — - - - ? यामुळे माझी समाजातील प्रतिष्ठा कमी होईल, यांचा विचार तिने कधी केला का ?

मला मदत करावीच लागणार ! एकेकाळी मी तिला माझी बहीण मानली. पण या मदतीने मला प्रतिष्ठा मिळेल काय ? छे ! ! समाज माझ्याकडे तुच्छतेने पाहील - - - - सारे लोक, माझे मित्र माझ्याकडं कुचेष्टेने पहातील. माझे मित्र कुचेष्टेने बोट दाखवतील माझ्यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. आतापर्यंत मिळवलेले सारं काही मातीत मिसळून जाईल पण ती माझी बहीण आहे. मानलेली का असेना - - — — —

पण — — — समाजाला तोंड कसं दयायच ? डॉक्टरना ही माझी कोण म्हणून सांगायचे ? आणि इतके दिवस झोपलात काय असं विचारल्या उत्तर काय? पण डॉक्टरनी माझ्यावर विश्वास कसा ठेवायचा ? खाजगी डॉक्टरकडे नेल तर आणि कोणाला समजल तरी पुन्हा माझी बोंब — --- — माझंच चुकलं - - आपण एखादी गोष्ट सहज म्हणून करून जातो पण याचे परिणाम किती दुरवर होतात व किती खोलवर होतात हिला मी माझी बहीण मानली, ती का मानली? ना नात्याची ना ओळखीची एकदा झालेली बहीण, आता तिला माझ्याकडे भीक मागण्याचा काय संबंध होता. नाही ! ! तिचा संबंध होता, म्हणूनच ती आली - - !

इतकी सात आठ वर्षे गेली. हिला कधीच भावाची आठवण झाली नाही ? आपल्या प्रियकराच्या प्रेमात पडल्यावर आपण काही चुकतो आहोत, त्याची आठवण झाली नाही ? त्यावेळी आपणाला भाऊ आहे, याची संमती घ्यावी असं कधीच वाटल नाही ? आणि आता का आली. हिला वाचवण्यासाठी जगात माझ्या शिवाय कोणीच नाही ?

बंधुप्रेम का समाज प्रेम - — - - प्रश्नाचे दोन डोळे माझ्याकडे रोखून पहात आहेत. माझ्या डोळ्या समोर छोटी बागडणारी, निरागस पिंकी उभी राहिली. त्या वेळी ही पिंकी असं काही करील याची मला कल्पना नव्हती होती ती एकच अपेक्षा बंधु प्रेमाची ! आज मला तिचा खूप राग आला आहे. माणसाने एखादया व्यक्तीचा केव्हा उपयोग करायचा याला काही मर्यादा ? - — - -

जाऊ दे, माझच चुकलं. माझ्या समोरच्या खुर्चीवर माझी छोटी बहीण पिंकी बसली आहे. माझ्या हातात नकळत पुस्तक आले आहे. माझ्या दोन परीक्षांचा निकाल आजच लागणार आहे. पिंकी एक अपराधी म्हणून माझ्या समोर खाली मान घालून बसली आहे. आणि माझ्या मनात एक मोठा प्रश्न उभा आहे. आता मी काय करु ?

पिंकी हे काय केलंस ? पिंकी

—: o :—

# जेव्हा शाहू गेला

प्रमोद बा. घाडीगावकर

आमच्या शाहूची जरी इतिहासाने दखल घेतलो नसली तरी आमच्या गावातील प्रत्येक घरामध्ये शाहूच्या मृत्युने खळबळ उडवून दिली. आणि हे खरेच होते. याचे कारण असे यापुढे आमच्या गावातील शिकारी म्होरक्या रघुनाना याला आपली शिकारीची हत्यारे जवळ जवळ पूजेला लावायला झाली होती. आणि विशेष महत्वाची गोष्ट ही की यापुढे लोकाना 'कोष्टी' मिळणार नव्हती. जेन्हा शाहूची अंतयात्रा निघाली तेव्हा कळत न कळत रघुनानांच्या डोळ्यातून आसवे गळू लागली. आणि जेव्हा शाहूला सरणावर ठेवले तेव्हा तर "शाहूऽऽ आता आमका रानात जावक नको रे' असे म्हणून रघुनानानी अक्षरशः हंबरडा फोडला होता.

आणि हे खरेच होते. आमच्या गावातील रघुनाना याना जर कसली आवड असेल तर ती कुत्रे पाळण्याची आणि अशा कुत्र्याना ऐतिहासिक नाव देण्याची. एकदा असेच कुठेतरी गावाला जात होते. आणि त्याना रस्त्यात हे कुत्र्याचे पिल्लू दिसले. त्यानी तात्काळ आपल्या पुढे जाण्याचा बेत रद्द केला कारण ही ब्याद पुढे नेली तर पाहूण्यांच्या कपळाला सतरा आठ्या पडायला नकोत. ! त्यानी त्या पिलाला घरी आणले आणि आम्हा 'शेमड्या' पोराना गोळा करुन त्याचे नामाधिकरण केले. शाहू ! त्यापासून हे कुत्र्याचे पिल्लू शाहूमहाराज या नावाने ओळखले जाऊ लागले. रघुनाना तर या पिलाला जीव की प्राण करत होते आणि त्याला आपल्याबरोबर रानात नेवून शिकारीची गोडी लावत होते कारण हे सर्व त्यासाठीच चालले होते. ते पिल्लू सुध्दा खाल्लेल्या अन्नाला जागून रघुनानाना प्रोत्साहन देत होते.

योग्य वयात येताच एक हूषार शिकारी कुत्रा म्हणून गावात मिरवत होता. गावातील लोक 'कोष्टीच्या' आशेने त्याला यथाशक्ती शिदा घालत. याला अपवाद होता फक्त आना पाटलाचा. ! कारण रघुनाना व आना पाटील यांचा छत्तीसचा आकडा

होता.

परंतु आज माळावरुन परत येणाऱ्या लोकांकडून अचानक शाहू मरुन पडल्याची बातमी आली होती. गावात ज्याना ही बातमी समजली होती ते माळावर धावत होते. खरोखरच आमचा शाहू मेला होता. प्रथम त्याला आम्ही चव्हाटयावर आणले. त्याला आम्ही गिधाडाच्या तोंडी देणार नव्हतो. आम्ही त्याची माणसाप्रमाणें अंतयात्रा काढायचे ठरविले. आणि त्या तयारीला लागलो. सर्वांना शाहूच्या मृत्युची वार्ता समजली नव्हती. जेव्हा गठठयाचा आणि ढोलांचा आवाज ऐकू येऊ लागला तेव्हा कोणाला हे काहीच माहित नव्हते ते विचारु लागले, 'कोण गेले' ?

अशा वेळी त्या माणसाला एवढेच उत्तर देण्यात येत असे 'शाहू गेला.' परंतु त्याना कोण शाहू याचा उलघडा होत नसे. तावडयांचा, देसायांचा की आणखी दुसरा कोण. कारण अशा शाहू नावाच्या गावात दोन-चार व्यक्ती होत्या. परंतु जेव्हा सत्यपरिस्थिती समजत होती तेव्हा हसून हसून मुरकुंडी वळायची, आणि दुखःही होत होते कारण वर सांगितलें आहेच की आजपासून लोकाना 'कोष्टी' मिळणार नव्हती.

मात्र शाहुचे क्रियाकर्म आटोपल्यानंतर आम्हा पोरांच्या डोक्यातले शाहूच्या मृत्युविषयीचे कुतूहल मात्र कमी होत नव्हते. कसेही करुन शाहूला मारणाऱ्याला शोधून काढायचे अगर चव्हाटयावर " बारा पाचाचा " जाब द्यावा असे आम्हास वाटत होते.

परंतु हे वाटते तेवढे सोपे नव्हते. पण हे आता ससजले आहे. शाहूला मारणारा आता मिळाला होता. तो दुसरा तिसरा कोणी नसून आना पाटीलच होता.

रघुनानावरील राग त्याने शाहूवर काढला होता. पण आना पाटील जेव्हा जेव्हा लोकाना भेटे तेव्हा आपणाला माहित नाही असें दर्शवून प्रत्येकजण म्हणत असे, " आमच्या शाहूक ठार करणाऱ्याक दिवस चांगले जाणार नाय" आना पाटील खाली मान घालून जाई. इलाजच नव्हता.

" त्येनी तरी आमचो खय विचार केलल्यान शाहूक विष घालताना ? "

# विनोद

एकदा एक मुलगा एका मुलीला म्हणाला, 'ये मुली तू फक्त चार शब्द माझ्याशी बोलावेस अशी इच्छा आहे. बोल ना! '
तेव्हा ती म्हणाली, फर्स्ट यू गेट आऊट! '

शिक्षक – जगात एकूण खंडे किती व कोणती ?
विद्यार्थी -- जगात एकूण खंडे तीन आहेत.
१ श्रीखंड, २ लोखंड, ३ वेखंड.

नवरा–(बायकोला) चल. आपण त्या समोरच्या दुकानात साडी घेवू.
बायको– नको त्या पलिकडच्या कॉर्नरवर घेऊ.
नवरा– अग तिकडे साडया फार महाग आहेत.
बायको– म्हणून काय झाले ? त्यांच्याकडे साडी घेतल्यावर कॅलेंडर किती छान देतात, माहीत आहे ?

**–सुभाष कोदे**

हार्दिक शुभेच्छा

# मिलन हार्ड वेअर मार्ट

## देवगड

प्रोप्रा. मनोहर मेस्त्री



प्रिंटिंग व्यवसायातील

तरुण उद्योजक

# मे. शामदीप प्रिंटर्स

मु. पो. कट्टा, ता. मालवण.

**आपल्या बहुमोल सहकार्याची**

**अपेक्षा करीत आहोत.**

**आपली छपाइची कामे**

## आकर्षक व त्वरित

करुन दिली जातील.

शाम पावसकर

दीपक भोगटे



हार्दिक शुभेच्छा--

# विविध वस्तु भांडार

## देवगड

शालोपयोगी पुस्तके, स्टेशनरी सामान

लोखंडी सामान व काचसामान

**माफक दरात मिळेल.**

प्रोप्रा. प्रभाकर कार्लेकर अँन्ड सन्स



# मे. अमृत विष्णु नलावडे

**जनरल मर्चंटस्, अँन्ड कमिशन एजन्टस्**

## देवगड

# राष्ट्रीय सेवा योजना-एक शिबीर
## (काही अनुभव)

आमच्यातील सुप्तगुणांचा विकास साधण्याची संधी म्हणजे शिबीर होय. कॉलेजात गप्प असणारा विद्यार्थी शिबीरात बोलका झाल्याचे आढळले. कोणतीही वस्तू जपण्याची व व्यवस्थित ठेवण्याची शिस्तही लक्षात आली. गांवच्या विहीरीतील पाण्यात जंतूनाशके टाकताना काही मालक म्हणाले, "आमच्या विहिरीतील बेडूक व मासे मरुन जातील." त्यांना समजावून सांगितल्यानंतर त्याकामात मदत करुन धन्यवाद देऊ लागले.

**—एक शिबिरार्थी**

---

मी एन्. एस्. एस्. ची विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून काम करत होते. माझ्या दृष्टीने १० दिवसापासूनच कॅम्प सुरु झाला होता. एखाद्या यजमान्याला ठरलेले लग्न व्यवस्थितपणे पार कसे पडेल याची काळजी असते तद्वतच आम्हा प्रतिनिधींची स्थिती झाली होती. आवश्यक साहित्य गोळा करताना काही ठिकाणी सहकार्य तर काही ठिकाणी 'नन्नांचा पाढा' यातून अनेक स्वभाव न्याहाळता आले. विशेषत: स्वयंपाक व्यवस्था माझ्याकडे सोपविली होती. आजारी मुलांना कुणाला पेज, कुणाला चहा, तर कुणाला गरम पाणी आवश्यकतेनुसार दिले गेले. कामाने थकवा कधी आला नाही.

**—कु. सुनंदा आपटे**

मी चार वर्षात एन्. एस्. एस्. चा प्रथमच कॅंप केला त्यामुळे एफ्. वाय्. च्या विद्यार्थ्यांचे व माझे अनुभव सारखेच म्हणावे लागतील. सेंट्रीपाळी व पाणीपाळी या गोष्टी मला नवीनच होत्या. याहीपेक्षा माझ्या नेतृत्व गुणाचा विकास करण्याच्या दृष्टीने शिबीर अत्यंत महत्वाचं ठरलं. शिबीराच्या सर्व प्रकारच्या कार्यातून वेगवेगळया क्षेत्राशी संबंध आला व त्या ठिकाणी कडु-गोड अनुभव मिळाले.

**—श्री. सूर्यकांत घाडी**

स्वयंपाकगृह, आचारी व सहकारी असं एक वर्तुळ माझ्याभोवती चहा पिण्यासाठी तयार झाले होते. जेवणाच्या बाबतीत सगळ्यांच्या आवडीनिवडी सांभाळून घ्याव्या लागत होत्या. मला असे वाटते की महाविद्यालय जरी विद्यार्थी एकत्र येण्याचे साधन असले तरी त्यातील राष्ट्रीय सेवा योजना शिबीर हे सहकार्याचे ओळखी वाढायचे क्षेत्र आहे.

**-रविंद्र पेडणेकर**

माझ्या स्मरणशक्तीप्रमाणे हा माझा पाचवा कॅंप असावा. कॅंपमधील नवीन मुलांचा बुजरेपणा आणि जुन्या मुलांचा निर्भिडपणा याचा सुरेख संगम म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. कार्यकारिणीतील विद्यार्थ्यांची धावपळ व इतर मुलांची कामाची तत्परता यांची क्षणोक्षणी जाणीव करुन देणारा तसेच आपल्या घरातील वातावरणात (रागलोभ) वावरताना नाही म्हटलं तरी अनुभवी माणसाला घ्यावी लागणारी भूमिका ही महत्वाची वाटते.

**- शशिकांत सांवत**

# नव्या म्हणी—

१) निवडणूकीपुरती आश्वासने.

२) साखर थोडी पाहूणे फार.

३) नाव धनपाल आणि घरात जेवणाचे हाल.

४) विद्यार्थ्यांपाठी अभ्यासक्रम.

# क्रौंचवध

**वि. स. खांडेकर**


कळया फुलल्याच नाही तर जग सौंदर्यास मुकेल. नद्या वाहिल्याच नाही तर लोक उपाशी मरतील.

प्रीती हे क्रान्तीचे दुसरे नाव आहे.

जखम झालेला मनुष्य कितीही शूर असला तरी वेदनांची छाया त्याच्या मुद्रेवर थोडी ना थोडी तरी उमटतेच.

प्रेम हा जुगार आहे ज्याची हरायची तयारी असेल त्यानेंच तो खेळावा.

**संग्राहक- सुभाष कोदे.**
एफ. वाय. बी. कॉम.



# मला दिसलेले जगन्नाथ भाऊ

प्रा. ल. दा. गोलतकर.

आठ वर्षापूर्वीच भाऊंशी माझा परिचय झाला होता. माझा व्यवसाय व भाऊंचे कार्यक्षेत्र तसे पाहिले तर भिन्न होते. पण शेती व व्यापार हे आमचे व्यवसाय व त्या व्यवसायातील माझ्या अनुभवामुळे मी भाऊंना आवडू लागलो.

सुशिक्षितांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आदर आहे हे ऐकून फार बरे वाटले. सह्याद्रीच्या कुशीत असलेले फोंडे ही त्यांची जन्मभूमी. मात्र कर्मभूमी सागरकिनाराच म्हणावा लागेल. जन्मगावी शिक्षणाची सोय नसल्यामुळे भाऊंना आपल्या आजोळी–देवगडला यावे लागले. इ स. १९०४ चा भाऊंचा जन्म. त्या काळात शिक्षणाकडे ओढा असणारे तुरळकच. त्यातून भाऊंच्या घरात व्यापार पुर्वापार चालत आलेला त्यामुळे त्यांचे मन शिक्षणात काही रमले नाही. जेष्ठ बंधुच्या धाकापोटी ते थोडेसे इंग्रजी शिकले. त्यावेळी वडिलोपार्जित व्यापार डबघाईला आला होता. त्यामुळे भाऊंना चरितार्थासाठी व्यवसाय शोधणे भाग होते. फारसे धन गाठीशी नव्हते.

सुरवातीला त्यांनी फोंडा–कणकवली परिसरात मासे विकण्याचा व्यवसाय सुरू केला. पण दैव पाठीमागे हात धुवून लागल्यानंतर धडगत नसते. त्याप्रमाणे आई आजारी पडल्यामुळे आईला घेऊन ते रत्नागिरीला गेले. व मे. लुब्रीशेठच्या पेढीवर काम करू लागले. कष्टाळू व प्रामाणिकपणा या गुणाच्या जोरावर मालकाची मर्जी संपादन केली. पण भाऊंचे मन दुसऱ्याच्या ताबेदारीत रमेना. त्यांच्या स्वच्छंदी मनाची कुचंबना होऊ लागली. भाऊंनी ताजी व सुकी मासळी याचेबरोबर काजूगर विकण्याचा जोडधंदा सुरु केला. त्यासाठी त्यांना घाटमाथी पूणे, कोल्हापूर बेळगाव या शहरांची वारी नेहमी

घडू लागली. भाऊंचे ताजे मासे इंग्रजी अधिकाऱ्यांच्या घरापासून ते मराठमोळ्या सरदार व्यापाऱ्यांपर्यंत जावू लागले. व्यापाराच्या निमित्ताने थोडा पैसा जमू लागला होता.च पण व्यवसायामुळे असंख्य माणसे भाऊंच्या ओळखीची झाली. केवळ गिऱ्हाईक आणि व्यापारी असे नाते न राहता स्नेहाच्या भांडवलात त्याचे रुपांतर झाले. त्यानंतर पैसा चांगला जमू लागला पण भाऊना त्याचा गर्व कधी झाला नाही. त्यांची राहाणी साधी होती. खादीचे धोतर, सदरा व टोपी हा त्यांचा आवडीचा विषय होता. मनाने ते कॉंग्रेसवाले होते. दर्यावर जाताना ते हाफपॅंट-शर्ट व माकड-टोपी घालीत. त्या व्यापारामध्ये भाऊंच्या नावाला वजन प्राप्त झाले. मानाने मोठे असणारे भाऊ मनानेही मोठे होते. ते आपल्या मित्रांची व नातेवाईकांची कदर करीत. कोणी अडचणीत असल्यास त्याला मदतीचा हात देत.

१९३५ नंतर भाऊंच्या कार्यक्षेत्राला व व्यवसायाला विशेष कलाटणी मिळाली. "टाईम्स ऑफ इंडिया" तील मच्छिमार व्यवसायाच्या विकासासाठी मुंबई सरकारने यांत्रिक बोटीना कर्जरुपाने मदत देण्याविषयीची जाहिरात देवगड हायस्कूलमधील त्यांचे जेष्ठ बंधु श्री. शंकरराव पारकर यांच्या वाचनात आली. ती योजना लगेच त्यानी भाऊना सांगितली. त्याप्रमाणे भाऊनी प्रयत्न केल्यावर सरकारने त्याना तीन लॉंचेस दिल्या, नंतर ससून डॉक येथे 'पारकर फिशरींग फर्म' सुरु झाले. कारवारपासून ताजा बांगडा स्वत: भाऊ खरेदी करुन मुंबईला पाठवित. फर्म सुरु झाल्यावर भाऊंची या व्यवसायातील हिंमत व पत वाढली. त्यानी फिशरीज डायरेक्टरची मर्जी संपादन केली.

फिशरीज डायरेक्टर मि. सेठना यांच्या प्रेरणेने पारकर बंधु, गवाणकर व पारशी व्यापारी यानी मिळून 'इंडिया फिशरीज कंपनी' चालू केली. त्याच बरोबर 'पारकर फिशरीज' बंद करावी लागली. काही वर्षाच्या व्यापारानंतर 'इंडिया फिशरीज कंपनीचे नुकसान होऊ लागले. त्यामुळे पारकर बंधु व गवाणकर भाग भांडवलासह बाहेर पडले. त्याचवेळी शंकरराव पारकर कालवश झाले. त्यावेळी भाऊ ४६ वर्षाचे होते. १९४७ सालची गोष्ट. कुटुंबाची सर्व जबाबदारी भाऊंवर पडली होती. त्यावेळी मुंबईच्या गुजराथी लोटस कंपनीकडे सहा मोठ्या लॉंचेस पडून होत्या. भाऊंचे नाव त्यांच्या कानावर गेले होते. हप्त्याने पैसे फेडावे या बोलीने भाऊना केवळ पत होती म्हणून सहा लॉंचेस मिळाल्या. पुन्हा एकदा भाऊनी जोमाने स्वत:ची नेव्हीगेशन कंपनी सुरु केली. मोठ्या प्रमाणात मासळी पाठविण्याचा सपाटा चालविला. त्यामुळे शंभर खलाशाना काम मिळाले त्यांच्या कुटुंबाचा चरितार्थही चालू लागला. मुंबई पोर्ट्रस्टकडून जागा घेवून कार्यालय उघडण्यात आले. त्याचबरोबर आंबा वहातूक देवगड, पूर्णगड, रत्नागिरी, बाणकोट आदी बंदरातून सुरु केली. पुढे ट्रकने मालवहातूक मोठ्या प्रमाणात सुरु झाल्यामुळे त्यांचा सागरावरील व्यापारावर परिणाम झाला. व त्यांचा धंदा बसला. त्यामुळे लॉंचीस विकाव्या लागल्या. त्यातच कनिष्ठ बंधु वसंतरावांचेही निधन झाले.

यावेळी भाऊंचे लक्ष देवगडी स्थिर झाले होते त्यानी हापूस आंब्याची लागवड केली. स्वत: खतपाणी घालून नात्यातील माणसाप्रमाणे मायेने कलमांची जोपासना केली. भाऊनी बागेसाठी खूप श्रम घेतले. त्याचबरोबर सागर आणि माशांवरील लक्ष काही कमी झाले नाही. देवगडला पहिली फिशमिल त्यानी सुरु केली. भाऊंपासून ही प्रेरणा नंतर अनेकानी घेतली. जीवनाच्या अनेक क्षेत्रात भाऊ उतरले होते. अप्रगत व अविकसीत मच्छिमार व्यवसायाला आज जे चांगले भरभराटीचे रुप आलेले दिसते त्यात भाऊंचा मोठा वाटा आहे. त्या कार्यात अनेक प्रशिक्षीत व अनुभवी खलाशी तयार करण्याचे श्रेय भाऊना द्यावे लागेल.

हजारो रुपयांच्या नोटा खिशात बाळगून दुसऱ्याला संकटकाळी देताना कर्णासारखा त्यानी उदारपणा दाखविला उपाशी अर्धपोटी राहून जीवनातील वादळाशी झुंजत भाऊनी एक आगळे व्यक्तिमत्व तयार केले होते. अनेक वेळा वादळात सापडलेल्या बोटीहून तारा आल्या की ते प्रथम खलाशी सुखरुप असल्याबद्दलची चौकशी करत. तसेच जवळची संपत्ती कर्तव्य भावनेने देण्याची प्रवृत्ती भाऊंकडे होती. थोडक्यात माणसांच्या वेदना अधिक तीव्रपणे समजावून घेणारे भाऊ होते.

अनेकाना निरनिराळया प्रकारचे स्वतःच्या पायावर उभे रहाण्यास शिकविणारे, व्यवसाय सुरु करण्यास त्यानी मदत केली. विद्यार्थ्याना, मंदीराच्या जिर्णोद्धारासाठी, मंदीरातील दीवाबत्तीसाठी खूप पैसा भाऊंनी मुक्त हस्ताने दिला. भाऊंनी दिलेल्या पैशांची कधी नोंद ठेवली नाही. किंवा घरातील मंडळीनाही सांगितले नाही. अनेकानी घेतलेले पैसे परत केले नाही तरी त्याबद्दल कधी हळहळ वाटली नाही. त्यामुळे समाजातील सर्व थराच्या माणसांना ते जवळचे व अ पले वाटत.

अंगिकृत व्यवसायात व जीवनात अनेक चढउतार आले पण भाऊ मनाने खचले नाहीत. त्यांचा उत्साह दांडगा होता. मनाचा तोलही त्यांनी ढळू दिला नाही. त्यांच्या लाघवी बोलण्यातही विलक्षण जादू असायची अनेक विषयावर तेवढयाच आवडीने ते चर्चा करीत असत. कोकण रेल्वे पेक्षा सागरीमार्ग भाऊंना व्हावा असे वाटायचे वाटेत येणाऱ्या खाड्यावर पूल न बांधता फेरी बोटी ठेवाव्यात अशीही इच्छा ते बोलून दाखवित मुंबई ते गोव्यापर्यंत सर्व बंदरे करणाऱ्या प्रवासी वहातूकीसाठी लहान व वेगवान बोटी असाव्यात असे त्याना वाटे कधी कधी देशातील वाढत्या महागाई बद्दल चिंता व्यक्त करीत. बेताबाताचे शिक्षण झालेल्या या माणसाला शिक्षणाविषयी अपार प्रेम दिसून येते. ज्ञानासारखे पवित्र कार्य या परिसरात चालावे म्हणून देवगड महाविद्यालयाच्या वास्तूच्या उभारणीसाठी तेवीस एकर जमीन दगडी कुंपणासहित विनाअट व निरपेक्ष भावनेने, कसल्याही समारंभाचा झगमगाट न करता दान केली, आणि सर्व स्तरातील व थरातील विद्यार्थांसाठी ज्ञानगंगेचा झरा चालू केला. 'शिक्षण विकास मंडळाने, भाऊंच्या प्रेमाच्या भावनेला कायम स्मृतीत ठेवण्यासाठी त्यांच्या सहचारिणीचे श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी, असे त्या महाविद्यालय वास्तूच्या परिसरास नाव देण्याचे निश्चित केले. देवगडमधील शिक्षणविकास कार्य आर्थिक स्थिती सुधारण्याच्य कार्यातही त्यान मोलाची भर घातली.

भाऊंची या जगावेगळया कर्तृत्वात त्यांच्या कुटुंबातील त्यांची सहचारिणी श्रीमती निराबाई, त्यांचे बंधु, पुत्र सर्वश्री सदानंद, रामकृष्ण, व धनंजय त्यांच्या सुना सर्वसौ. सुमन प्रभा व शशिकला यांचा बराच मोठा वाटा असल्याने भाऊंना निश्चित मनाने सर्वकाही करता आले. अनेक कार्यात मग्न व तत्पर असणारे भाऊ काहीवेळा अवखळपणा व खोडकरपणा करताना दिसायचे. कधी निरागस मनाने विनोद करून दुसऱ्याना हसवायचे. ध्येयावर कणखर निष्ठा, शिस्त हिंमत, दिर्घपरिश्रम प्रयोगशिलता असें अनेक गुण भाऊंच्या ठिकाणी एकवटले होते. या त्यांच्या गुणामुळे शासकिय अधिकारी वर्गही भाऊंना आदराने वागवत. जीवनभर भाऊनी जनसेवा हीच इश्वरसेवा या डोळस श्रद्धेने कार्य केले आणि एक कृतकृत्य आयुष्य जगले. प्रेम, कुतुहल व आदर बाळगावा अशीच त्यांची कर्तबगारी होती.

भाऊंच्या स्मृतीस अनंत प्रणाम.

# THE FLY

*Sanjeev V. Kulkarni.*
12 th Commerce.

A Roman Poet, Petronius said that men were meaner than Flies. Flies have their virtues but we are rothing but bubbles.

Today we are urgently made familiar with the danger of flies. We are shown how they contaminate our food; and so cause intensive diseases, which not only weaken men and women so that they can not do their work, but also kill both children and grown-up by the thousands by causing epidemics of Cholera and Dysentery.


We can hardly find any virtue in the housefly. But there are people who have discovered virtnes in them and who greatly admire the qualities shown by this tiny black nuisance. It has been said that we can probably find nowhere a better type of a perfectly free and brave creature. There is no Courtesy in it. It does not care whether it is a king or a clown whom it teases. In all its swift movements, which seem entirely random it shows perfect independence and self. confidence, as if it were quite sure that the world was made for flies.

It you strike at it with your hand it will be to him as if a great airship were to come crashing down on you. But it is used to such dangers, and thinks little of them. It just moves out of the way of your hand alights on the back of it. You cannot terrify it, nor govern it nor persuade it. It has his own opinions on all matters and will ask no advice of yours.

It seems to have no work to do but to find food. The earthworm has its digging, the bee her gathering and building; the spider her cunning net work; the ant her treasury and accounts. All these are comparatively slaves or oreatures of vulgar business. But the fly, free in the air and free in your room. wandering, flitting, feasting at it's will, from the heaped sweets in the grocer's windows to the refuse in butcher's back-yard. what freedom can equal its ?

Man has at last found means to defend himself and get rid of the fly by the perforated swot and poisonous vapour, the just as he has found means to slaughter the beasts of the forest; the jungle and the mountain.

But such is the endurance of the fly that when the last of men are dead and gone it will still be found living on all that may be left with life.



# ईश्वरनिष्ठ शांतारामबापू

शा. म. पागनीस.

**एका ईश्वरनिष्ठाचा उत्कट मनोदय.**

किंबहुना दिवसराती । पुढीलांचे सुख उन्नति ॥
आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥ (१६-२०२ ज्ञानेश्वरी)

अद्रोहत या श्रेष्ठ गुणाचे लक्षण संत ज्ञानेश्वरानी आपल्या वरील ओवीत सांगितले आहे. आत्महित साधीत असता सदैव दुसऱ्याच्या सुखाचा विचार करणाराच सुजन होय. संत ज्ञानदेवानी विश्वात्मक देवाकडे ' ईश्वर निष्ठांची मांदियाळी ' या भूतलावर सतत अवतरत राहावी असा प्रसाद मागितला, तो याच दृष्टीने. कारण ईश्वरनिष्ठांच्या सहवासात भूतमात्रांमध्ये अद्रोहत्व-सुजनत्व स्फुरते व ते टिकून राहातेही परिसाच्या स्पर्शाने जसे लोहाचे सोने होते तसेच ईश्वरनिष्ठांच्या मंगल सहवासात खलांची व्यंकटी जाते. ते सुष्ट बनून सत्कर्माच्या आचारात रस घेऊ लागतात. दुष्टांमध्ये सुजनत्व आणणे हाच विश्वसुखाने भरुन टाकण्याचा मार्ग होय असा संतांचा सिद्धान्त आहे.

या करिताच सर्वात्मक ईश्वर हा संतांच्या रुपाने अवतार घेतो.

## ईश्वरनिष्ठ शांतारामबापू

सुखाची समृद्धि करणे हीच खरी क्रांति होय ती मानवाची विचारधारा बदलण्याने साधते आणि हे कार्य केवळ ईश्वरनिष्ठच करु शकतात करवीर नगरीत पण कधी गेलांत तर आपणास अशा एका ईश्वरनिष्ठाचे दर्शन होईल. त्यांचे नांव आहे शांतारामबापू बालावलकर भेटणारांना ते इतर चारचौघां प्रापंचिकासारखेच दिसतील. कारण 'अलौकिका नोहावे इतरांपति, अशी त्यांची एकूण वृत्ती आहे.

## बापूंचे जीवन पालटणारी विलक्षण घटना

मानवी जीवनांत ज्याच्या त्याच्या सुकृताप्रमाणे चांगल्या आणि वाईट अशा घटना घडत असतात. त्यामुळे त्यांचे जीवन कधी सुखाने उजळून जाते अगर विषादाने काळवंडून जाते श्री. शांताराम बापूंच्या पुण्याईने अशी एक विलक्षण घटना घडून आली आहे कीं, त्यामुळे त्यांचे सर्व जीवनच उजळून गेले आहे ती घडलेली घटना अशी कीं, — — — —

कोल्हापूरला शाहूपुरीत रहणारे प. पू. बालावधूत महाराज यांची व शांतारामबापूंची प्रथम भेट १९५५ च्या सुमारास झाली. प. पू. बालावधुत महाराज हे आजन्म दिगंबरावस्तेत रहात होते. ते फारसे बोलत नसत. वरवर पहाणारांना तर महाराज वेडसर दिसत. असे असूनही ते दत्तावतारी असल्याची अनुभूति अनेकांना प्रत्ययास आली होती. अशी कांही मंडळी महाराजांच्या भोवती राहून त्यांची सेवा करण्यात कृतकृत्यता मानीत असत. तथापि शांतारामबापूंना ते महाराज आणि त्यांचे सेवामग्न भक्तगण हे अविचारी, व्यवहारी आणि भोळसट वाटत असत. आणि ते असे बोलूनही दाखवित असत. त्यांचे हे उद्‌गार ऐकून एके दिवशी महाराजांचा भक्त असलेला शांतारामबापूंचा स्नेही त्यांना म्हणाला, 'बापू एकवेळ भक्तीभावाने दर्शन घे., त्यांची मनापासून सेवा कर. पहा काय आनंद वाटतो तो. कोणत्याही गोष्टीची अनुभूती होण्यापूर्वीच ती चांगली किंवा वाईट म्हणू नये.' स्नेह्याच्या 'अनुभूति' या शब्दाने शांतारामबापूंच्या मनाची पकड घेतली. ते घरी आले तरी "अरे बापू कोणत्याही गोष्टीची अनुभूती घेतल्याशिवाय ती चांगली किंवा वाईट म्हणू नये.' हे त्यांच्या स्नेह्याचे शब्द त्यांच्या मनात सतत घोळत राहिले. दुसरे दिवशी दुपारचे वेळी म्हणजे ज्यावेळी महाराजांजवळ फारसे कोणी नसत त्यावेळी बापू तेथे गेले. त्यावेळी महाराज डोळे मिटून स्वस्थ पडले होते. बापूनी महाराजांच्या जवळपास कोणी नाही असे पाहून महाराजांच्या काना जवळ तोंड नेऊन ते बोलले, 'अरे, लोक तुला दत्तावतारी समजत त आणि तुझी दत्त म्हणून भक्ती करतात. पण मला मात्र तू व तुझे भक्त वेडेपीर वाटतात तू खरोखरच जर अवतारी पुरुष असशील तर मला अशी अनुभूती, प्रचिती दे. मी प्रभू दत्तात्रयाचा भक्त आहे पण तुझा भक्त मात्र होऊ शकत नाही. एक मात्र मी सांगतो की माझ्या प्रिय प्रभू दत्तात्रयाचे दर्शन तुझ्यात झाले की मग माझ्या जीवनाचे सार्थक मानीन. 'याचसाठी केला होता अट्टाहास, हा माझा अट्टाहास पुरा होईल आणि माझ्या लौकिक जीवनाला पूर्णविराम देऊन सर्वस्व तुझ्या चरणी समर्पण करीन.

बापूनी उच्चारलेले कठोर शब्द महाराजानी ऐकले. त्यांच्या चेहऱ्यावर किंचितसे हास्य विलसल्याचे दिसले. त्याच रात्री बापूंच्या स्वप्नांत एक बालावधूत महाराजासारखा दिसणारा संन्यासी आला, आणि म्हणाला, "कायरे, तुला कसली प्रचीति हवी आहे? तुझ्या अंतःकरणांत जो आहे तो मीच आहे.,, आणि असे म्हणत त्या संन्याशाने दोन्ही हातांनी आपली छाती उघडली. आणि त्यातून एका

छोटीशी दत्तमूर्ति काढून ती जमिनीवर ठेवली. जमिनीचा स्पर्श होतांच ती मूर्ति एखाद्या अजाण बालकाप्रमाणे दुडुदुडु धावत बापू झोपलेल्या पलंगापर्यंत आली. बापूंना याचवेळी जाग आली. स्वप्न विरुन गेले संन्यासी, दत्तमूर्ति आदि दृष्य त्यांच्या दृष्टीआड झाले.

## -आणि बालावधूत महाराजांनी चुटकी वाजवली

स्वप्नातून जाग येताच शांतारामबापूंना वाटलें, 'माझ्या अंतःकरणांत सदैव असणारा प्रभु दत्तात्रय हाच वरवर वेडा दिसणारा देह धारण करुन आला आहे. ईश्वराची लीला अगाध आहे.'' असा विचार करुन बापू प. पू बालावधूत महाराजांकडे गेले. बापूंना पहाताच महाराजांनी आपल्या उजव्या हाताने चुटकी वाजविली आणि आपल्या चेहऱ्यावर असा काही भाव व्यक्त केला की त्यातूनच बापूंना सर्व काही समजून चुकले. बराच वेळ दोघांमध्ये "शब्देविण संवादिजे" असा संवाद झाला आणि जीवनाची सार्थकता झाली. या भावनेने बापूंच्या नेत्रातून अश्रु ओघळले. त्यांनी जवळच असलेल्या वृंदावनातील तुळशीची पाने घेतली आणि ती महाराजाच्या चरणी वाहून ते म्हणाले "सर्वात्मका ईश्वरा दत्तात्रया, या वेषांत मी तुला ओळखले नाही. अपराध घडला माझ्या हातून. तू जगताची माऊली आहेस. या अज्ञान बालकावर रागावू नकोस. आज या तुळशीपत्राबरोबर मी माझे सर्वस्व तुझ्या चरणी अर्पण करतो आहे. यापूढे तुझी सेवा हेच माझे काम राहील.'

## दिव्य प्रचितीने नतमस्तक

बापूंना आलेल्या या दिव्य प्रचितीनंतर त्यांचे संपूर्ण जीवनच पालटून गेले. ते आपल्या प्रपंचात एखाद्या अयस्थाप्रमाणे वागू लागले. सन १९५७ मध्ये प. पू. बालावधुत महाराजांनी समाधी घेतली त्यानंतर शांतारामबापूनी आपल्या घराचा, दुकानाचा आणि इतर सर्व मालकीच्या स्थावर जंगम मिळकतीचा प. पु. बालावधुत महाराजांच्या नावे ट्रस्ट केला. आज ते आपल्या दुकानात काम करताना दिसतील पण मालक म्हणून नव्हे तर एक सेवक म्हणून. त्यांनी त्यांच्या रहात्या घरालाही मंदीराचे रूप दिलेले असून त्यात स्थापन केलेल्या बालावधुतांच्या प्रतिमेचे दर्शन घेण्यासाठी ते सर्वांना खुले ठेवले आहे. पूर्वी त्यांच्या मालकीच्या असलेल्या लक्ष्मी-नारायण मिलच्या जागेवर सुमारे सात लाख रुपये खर्च करुन बालावधुतांचे एक भव्य मंदीर उभारले आहे आणि त्यांच्या घरी आणि मंदीरात सदैव पूजा-आरती, मंत्रपठण कथाकिर्तन प्रवचन असे आध्यात्मिक कार्य सतत चालू आहे- त्या मागील उद्देश जनतेत ब्रह्मविद्येचा सुकाळ व्हावा आणि त्यांचे सर्वच व्यवहार आनंदानें व्हावेत असा आहे. ब्रह्मविद्येनेच माणसाला त्याचे इहलोकीचे कर्तव्याचे ज्ञान होते. आणि शास्वत सुख हे इंद्रियातीत आहे याची जाणीव होते. ही जाणीव होणे म्हणजेच मनाचे आरोग्य. या आरोग्य लाभासाठीच ब्रह्मविद्येची मात्रा सदैव घ्यावी लागते. ' त्याचे अनुपान अलौकिका नोहावे लोकांप्रति ' हे आहे.

## बापूंचे अखंड २३ वर्षे निरलस प्रभुकार्य.

शांतारामबापू जनतेच्या मनाचे आरोग्य राखण्याचे प्रभुकार्य गेली तेवीस वर्षे निरलसपणे करीत आहेत. तरीदेखील हे काम अपुरे आहे याची बोच सतत त्यांच्या मनाला लागून आहेच. अध्यात्माने मन निरोगी राहाते. आणि विज्ञानाने शरीर निकोप राहाते. शरीर व मन दोन्ही निकोप व निरोगी असतील तरच मानव सुखी होऊन आपले जीवन यतार्थपण जगू शकेल. हा बापूंचा सिद्धान्त आहे. म्हणून जनतेच्या शरीरस्वास्थ्या साठी आपण काहीतरी केले पाहिजे अशी तीव्र तळमळ गेली कित्येक वर्षे त्यांच्या ठिकाणी आहे. ते बालमुकुंदाच्या प्रतिमेपुढे नतमस्तक होऊन म्हणत असतात, 'मुकुंदा दत्तात्रया, हे कार्य तुझेच आहे आणि तूच करणार आहेस

या कार्यपूर्तीसाठी मला निमित्तमात्र केलेस तर ती तुझीच कृपा.'

**दीड कोटीचे भव्य मंदीर बांधण्याचा मनोदय.**

जनतेच्या शरीरस्वास्थासाठी आपण काहीतरी केलेच पाहिजे. या विचाराने वेडे झालेल्या शांताराम-बापूंनी, समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल व त्याचबरोबर सबलांना योग्य असा औषधोपचार मिळावा यासाठी एक भव्य रुग्णालय करवीर नगरीत उभारावे असा आपला मनोदय नुकताच बोलून दाखविला आहे. त्याकरीता रुग्णालयास लागणारी मोकळी जागा मिळावी म्हणून त्यानी राज्यसरकारकडे विनंती अर्जही केला आहे. रुग्णालयासाठी सुमारे दहा हजार चौरस मीटर जागा सरकारकडून लवकर मिळेल असा विश्वासही त्याना वाटत आहे. सर्व अत्याधुनिक सोयींनी सुसज्ज असे रुग्णालय काढण्यास सुमारे दीड कोट रुपये खर्च येईल. या बाबत मी बापूंना विचारले 'बापू इतका पैसा तुमच्याजवळ आहे का?,, त्यावर ते उत्तरले की, " प्रभू दत्तात्रय कुबेर आहे. मग मला पैशाची कसली चिंता? त्याचे कार्य तो करुन घेणार कबीराचे एक वचन माहित आहे का ? ' राम हमारा जप कर हम बैठे आराम.' म्हणजे फक्त एखादाच संकल्प करावयाचा असतो. अर्थात हा संकल्प विश्वमांगल्याचा असला पाहिजे मग कार्यही त्याचे आणि करवून घेणाराही तोच. आपण फक्त निमित्तमात्र आहोत., अशा या मेणाहुन भक्त असणाऱ्या विष्णूदासाचा ईश्वर निष्ठांचा भव्य, मंगल व उत्कट मनोदय आहे. जनता-जनार्दनाच्या रुपाने वावरणारा बालमुकुंद सर्वकाही करून घेईल अशी त्यांची श्रद्धा आहे. अशा या विनम्र इश्वरनिष्ठाचा, शांतारामबापूंचा मंगल मनोदय म्हणजे प्रभूंचा मनोदय सिद्धीस पाहाण्याचे भाग्य आपणा सर्वांना शक्य तितक्या लवकर लाभावे हिच विश्वात्मक देवाच्या चरणी विनम्र प्रार्थना.


सर्व प्रकारच्या मरीन डिझेल इंजीनची दुरूस्ती
त्यांचे स्पेअरपार्टस करून मिळण्याचे
विश्वसनीय ठिकाण.
शाळा कॉलेज व ऑफिससाठी लागणारे
स्टील फर्निचर ऑर्डरप्रमाणे करुन मिळेल.
सर्व प्रकारचे स्टील फॅब्रीकेशन.

**मिलिंद इंजीनीयरींग वर्क्स**

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

**प्रोप्रा. मिलिंद सावळे.**



हार्दिक शुभेच्छा

**संतोष स्टोअर्स**

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

**प्रोप्रा. भास्कर दांडेकर.**

# प्लीज एक्स्क्यूज मी

संजय मालंडकर.
टी. वाय्. बी. कॉम.

Please, excuse me,!

शुक शुक, तुम्हालाच!

त्याने मागे वळून पाहिले आणि गोंधळलेल्या अवस्थेत तसाच काही क्षण उभा राहिला. ओळखीची नसणारी कॉलेजमधली एक स्मार्ट तरुणी आपल्यासारख्या कफल्लकाला हाक मारतेय, या जाणिवेने तो क्षणभर सुखावला. आणि तिचे काय काम असाव बरं? या विचारात परत बुडून गेला. "कॉलेज सुटल्यावर दोन मिनीटं थांबाल का? माझं एक काम आहे."

समोरच्या सोनचाफ्यापाशी - — -

ती आली तशीच एखाद्या वावटळी सारखी निघुन गेली

कॉलेज भरण्याची वेळ झाली.

तो वर्गात जाऊन बसला पण लेक्चरमध्ये त्याचे लक्षच लागेना. सारखे त्याच्या डोळ्यापुढे शब्द तरळू लागले.

'Please, excuse me!,

त्या नेघड्याळ पाहिले अकरा वाजून दहा मिनिटे झाली होती म्हणजे शेवटचा पिरियड संपायला फक्त पाच मिनिटे होती. बेल झाली तसा तो घाईघाईने बाहेर आला. बरोबरच्या मित्राना काही कारण सांगून त्याने वाटेला लावले.

सोनचाफ्याच्या झाडापाशी तो तिची वाट पहात थांबला.

'Sorry, हं, मला उशीर तर नाही ना झाला?,,

युगान युगाची मैत्री असल्यासारखी ती बोलत होती. अं, नाही नाही., गोंधळलेल्या मनःस्तितीतच त्याच्या तोंडून कसेबसे शब्द बाहेर पडले. तो तिची नजर चुकवून तिचे मुखकमल न्याहाळीत होता.

'– – आपली ओळख!' – – – काहीतरी बोलावे म्हणून तो बोलला.

"मी, श्रद्धा देशमुख, बी कॉम च्या पहिल्या वर्षाला आहे मी.

तुम्ही राहता कुठे?,,

तिच्या प्रश्नाचा त्याला राग आला. कशाला ओळख देख नसताना माझ्याबद्दल फुकट चौकशी?

आधीच तो गरीब कुटुंबात जन्माला आलेला, त्यात वडिलांना पारखा झालेला, मिळणाऱ्या शिष्यवृत्ती वर आणि एकटच्या आईच्या कष्टांवर त्याच शिक्षण कसबसं चाललेल.

मी हिला कसं सांगू? ऐकू दे सारं.
मनात विलक्षण गलबला माजला होता.
'मी– – – मी खरं सांगायचे तर मी वरळीला एका झोपडपट्टीत राहतो, विमनस्क अवस्थेत खरे ते तोंडून बाहेर पडले.

"फार त्रास पडत असेल नाही. गरीबीत शिक्षण घेताना?, ती.

'खूप त्रास पडतो, नाही कळायच्या त्या यातना तुम्हा-ला त्या देखील वाटचाला यायला नशीब लागतं. जाऊ दे, वैभवाची आणि समृद्धीची झुंबरं पाहाणाऱ्या तुमच्या-सारख्याना सांगून काय उपयोग ? '

तो खिन्नतेने सार बोलत होता. त्याच्या गरिबीच्या उल्लेखाने त्याचा स्वाभिमान दुखावल्यासारखा झाला त्याच्या गरिबीचा उल्लेख केलेला आवडत नसे. उगीचच ती भिकाऱ्यांच्या पुढे फेकल्यासारखी खोटी सहानुभूती उगीच खोटा दिलासा, नकोच वाटे त्याला ते सगळे.

'अभ्यासाला इतके हुषार आणि सज्जन आहात पण मी एकाच गोष्टीचा विचार करते आहे. वर्ष संपत आले तरी तुमच्या अंगावर एकच ड्रेस. घरची परिस्थिती चांगली नसेल तर नोकरीसाठी पप्पाना सांगू का ? आमची एक फर्म आहे. मिळेल तुम्हाला चांगल काम. गरीबीने बुद्धीचे खोबरे होते. तुमच्या-सारखें तरुण शिकले पाहिजेत ' ती बोलत होती.

' काही नको काही गरज नाही त्याची. नोकरी मी मिळवीन माझ्या हिमतीवर, तुमच्या शब्दावर अवलंबून राहाण्याची गरज नाही मला. ' तो संतापाने बेभान झाला होता. कुणापुढेही लाचारी पत्करणे त्याला मान्य नव्हते.

ती हिरमुसली झाली. आणि आल्यापावली तशीच परत निघून गेली.

तो खिन्न होऊन घरी आला. आई नुकतीच घरी आली होती. तिने जेवायला वाढले. जेवणात सुद्धा त्याचे नीट लक्ष नव्हते. आईने ओळखले, आज मुलाचे लक्षण काही ठीक नाही. पण जेवणावर ती काही बोलली नाही- तो जेवण आटोपून अभ्यासाला बसला. आईने आपले जेवण आटोपले व ती कामाला जायला बाहेर पडली.

' आई आज इतक्या लवकर ?'

' हो रे, आज एक नवीन काम मिळालय.'

आई चार घरची धुणीभांडी करुन आपला आणि मुलाच्या शिक्षणाचा खर्च चालवीत होती. मुलाचे कॉलेजचे शिक्षण पुरे करायचे तर हे सारे केल्याशिवाय पर्यायच नव्हता. तिनेही कधी त्याबद्दल दुःख मानले नाही. तिचा सारा जीवच त्याच्यासाठी तडफडत होता. पण आईने असे स्वतःच्या शरिराचे हाल करुन आपल्याला शिक्षण द्यावे हे पटत नव्हते.

त्याने सहज चौकशी केली. ' कुणाकडे काम मिळालयं ? '

देशमुख म्हणून आहेत सरकारी अधिकारी आहेत हो आणि ऐकलस का, तुला नोकरी मिळावी म्हणून मी शब्दसुद्धा टाकलाय त्यांच्याकडे' आई भोळ्या भावानें बोलून गेली.

''आई, पण तुला माहित आहे ना, मला उगीच कुणी उपकार केलेले आवडत नाहीत.' तो.

पण बोलण्यास तिला जणू हुरुप आला होता.

''अरे, तुझ्या वडिलांचे ते मित्रच निघाले. आणि

काय म्हणाले ठावूक आहे का ?

मी माझ्या मित्राच्या मदतीमुळे एवढा क्लास वन ऑफिसर होऊ शकलो. तुमच्या मुलाला नोकरी देणं माझे कर्तव्यच नव्हे काय ? मी त्याला आजपासून माझ्या मुलाप्रमाणेच मानीन ?,,

तो खूप शरमला, आपल्या वडिलांच्या मित्राबद्-दल, इतक्या उदार अंतःकरणाच्या माणसाबद्दल आपण असे वाकडेतिकडे बोलून त्यांचा अपमान करायला नको होता. आणि तेही त्यांचा मुलीदेखत. तिला आपले शब्द ऐकून किती वाईट वाटलं असेल ? त्याला उगाचच रुखरुख लागली. कधी कॉलेजमध्ये जातो आणि तिची क्षमा मागतो असे त्याला वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी सकाळी तो कॉलेजला गेला. डोळे शोध घेऊ लागले. तो तिच्या वर्गासमोर गेला. ती आत काहीतरी लिहित बसली होती. बहुदा कसल्या तरी नोटस् काढीत असावी.

'Please excuse me!'

शुक शुक तुम्हालाच.

तिने नजर उचलली. तिच्या प्रसन्न चेहऱ्यावरची चमक नाहिशी झाल्यासारखी त्याला वाटली. भानावर येऊन तो म्हणाला.,

'कॉलेज सुटल्यावर दोन मिनिटे थांबाल का ? प्लीज त्या समोरच्या सोनचाफ्यापाशी.'

पिरिअड संपल्यावर तो तिची वाट पाहात होता. काही वेळानें ती आली. दोघांच्याही डोळ्यात अपराधीपणाची भावना तशीच होती. दोघेही एकमेकाकडे बघण्याचे टाळीत होती. दोघेही खूप वेळ तशीच गप्प राहिली. खरं तर अपराध दोघांचाही नव्हता. आणि ही कोंडी फोडायला शब्द सापडत नव्हते. दोघांच्या मनामुळे विलक्षण द्वंद्व दोघांत उभे राहिले होते.

'काही काम होतं का ?' तिनें विचारले कालचा मोकळेपणा त्यात मुळीच नव्हता.

'अं ऽऽ होय.' तो तंद्रीतच म्हणाला.

'मग सांगा ना !' ती.

तो बराच वेळ घुटमळला, व मग हलकेच बोलला 'सॉरी हं एक्सक्यूज मी.' ती काय समजायचे ते समजली. ती गोडसे हसली. अगदी मृगनक्षत्रातल्या सरीसारखी. आणि दुसऱ्याच क्षणी तशीच लाजत निघून गेली. तिच्या हसण्यात तिच्या केसातला गजरा कधी पडला तेही तिला समजले नाही.

त्याने हलकेच गजरा उचलला. त्या गजऱ्यातही तिच्या निष्पाप मनाचा सुगंध दरवळतो आहे. असे त्याला वाटले. आणि नकळत ओठावर शब्द उमटले. ..

गंध फुलांचा गेला सांगून
तुझे नी माझे व्हावे मिलन.

# रातराणी

एका सुगंध राती
नभ झाले निळे निळे.
दुडू दुडू खेळती कशी
चांदण्याची बाळे.

रम्य चांदणी डोकावते
फुललेल्या रानीवनी.
मध्येच दरवळते
सुगंधी रातराणी

उसळत्या या भावना
धावणाऱ्या ओढ्यागत
आपल्या अंतरी
दवबिंदूचे मनोगत

चंद्रकोरी पाकळ्यातून,
श्वास फुलले नकळत.
हिरव्या वनश्रीत
राहिले हासत

**मोहन तेली.**
टी. वाय. बी. कॉम.

कोणत्याही प्रकारच्या इलेक्ट्रीक सामान खरेदीसाठी

**ए-वन इलेक्ट्रीक स्टोअर्स**

**जामसंडे**

कोणत्याही प्रकारच्या फोटोग्राफ साठी

**दिर्बादेवी छाया स्टुडिओच**

आणि

ग्राहक पसंद करतात.

कारण एकच

**योग्य दर, वक्तशीर सेवा, आणि**

**सचोटीचा व्यवहार**

**प्रोप्रा. मधु गोगटे**


# मोह

किती भ्रमरा नीच तू दिसशी
ओवाळून टाकल्यास स्फूर्तिच्या ज्योती
ग्रासावयासी आलास मजला
किंतू नच मिळ मोह.
जा इथून ऽ देईन शाप.
असा कारे ! करतोस छळ
पंख तुझे भारी अवखळ
ओध तुज कसा अमाप
खेळून नित्य मजसवे लावूनी जीव
जाशी कोठल्या दूरदेशी.

**नंदकिशोर धुरी.**
टी. वाय. बी. ए.


देशी विदेशा औषधे, शेती व बागायत
याना लागणारे किटकनाशक औषध
स्प्रेपंप, मार्टन पेंटस्, चहापावडर, विडी,
सिगारेटस्, बिस्किट व स्टेशनरी माल

**मिळण्याचे खात्रीशीर ठिकाण.**

**मे. जनार्दन मंगेश कुळकर्णी**

**आणि कंपनी, देवगड.**

**केमिस्ट अँड ड्रगिस्ट**

दुकान २७
निवास ५४


*MARRIAGE SORROWS*

On his death, bed poor Lubin lies
His spouse is in despair
With frequent sighs and mutual cries
They both express their care
A defferent cause, says person sly
The same effect may give
Poor Lubin Fears that
He shall die, his wife that
He may live

*Suhas Kanerkar.*

# कौशल्य

**अेम्. आर. खान.**
एस्. वाय. बी. कॉम.

तुम्हाला पैशाचा तुटवडा आहे? तुमची आर्थिक परिस्थिती धोक्यात आहे, तर मग माझा मित्र मन्या उर्फ मनोहर देशपांडे जस दरदिवशी डोक चालवून भरमसाट पैसे मिळवतो तस डोकं तुम्हालाही चालवावं लागेल. त्या दिवशीचाच त्याचा एक किस्सा मी सांगतो तुम्हाला! त्याचा तुम्हाला उपयोग होईल कदाचित मग तुम्ही म्हणाल पैसे मिळवण एवढ सोप असत.

समोरच्या धावपट्ट्यावरुन पाचही घोडे विजेच्या वेगाने पळत होते. त्यांच्या पेक्षा अनंतपट गतीने रसिकांची मने धावत होती. अॅटलस् पहिला येईल, कुणाचा डॉन लाडका होता, तर कुणी जॉनीवर जान कुर्बान करत होते. पण मन्याचे लक्ष वेगळीकडेच होते खिशातील पैसे वाढतील कसे याच विवंचनेने पछाडला होता. दरदिवशी रेसकोर्सवर पैसे लावून खेळणे आणि ते घालवण्याचा खुळेपणा त्याने कधीच केला नाही. आज कोणती शक्कल लढवावी ह्या चिंतेने त्याला ग्रासले होते एवढ्यात कुणाच्यातरी फ्लॅश कॅमेऱ्याचा भला मोठा फोकस समोर चमकला. आणि त्याचबरोबर मनोहरचे डोक आगळ्या खुशीने चमकले. घोडे जवळ येत चालले होते. शक्य तेवढ्या लवकर हालचाली करणे आवश्यक होते. आजूबाजूच्या साऱ्या श्रीमंतांचे लक्ष दूर्बिणीतून घोड्यांकडे होते. उत्तेजनार्थ आरोळ्या वाढल्या होत्या डोळ्यांसमोरची दूर्बीण मन्याने गळ्यात अडकवून टाकली.

बाजूची आसामी बडी होती. मनोहरने त्याचे लक्ष आपल्याकडे वेधले. त्याच्याशी पैज मारली, डॉन पहिला येणार, पण त्या साहेबानां हिन्द रुस्तुमशिवाय कोणी येणारच नाही याची खात्री होती. मन्या काही आपला हट्ट सोडण्यास तयार नव्हता. दोघे अटीतटीवर आले आणि दहा हजाराची पैज लागली. डॉन पहिला आला तर मन्याला दहा हजाराचा निव्वळ फायदा होता, हरला तर मात्र तो दहा हजारांना मोताज होणार होता. क्षणात प्रॉमिस नोट बनवली गेली. आणि मन्या तिथून दुसरीकडे वळला.

समजा हरलोचतर दहा हजार घालवायची तयारी नव्हती. मन्याने शक्कल लढविली. दुसरीकडे एकाला गाठले. त्याला सांगितले. आज हिन्द रुस्तुमशिवाय कोणी येणारच नाही पण तो म्हणे डॉनच येणार पुन्हा पैज. बारा हजाराची पैज लागली सारे सोपस्कार पुन्हा केले. आज डॉन आणि हिंदरुस्तुम या दोघातच खरी चुरस होती.

मन्याच्या या व्यवहारातही तोटा होण्याची शक्यता नाकारता येत नव्हता. यासाठी त्याने एका नव्या वेड्या गर्भ श्रीमंताला गाठले. तो म्हणे सुरवाती पासून पुढे असणारा 'अॅटलास येणार. त्याच्याबरोबर पाच हजाराची पैज लागली. पुन्हा प्रॉमिस नोट बनविली गेली. घोड्यांचा शेवटचा फेरा संपत होता. गलका वाढला होता. सग-ळ्यांच्या उत्कंठा ताणल्या गेल्या होत्या. आणि शेवटी कल्लोळाने परिसीमा गाठली. कुणाच्या आरोळ्या आनं-दाच्या तर कित्येकांच्या दु:खातिरेकांच्या - - - !

डॉनने सर्वप्रथम येवून बऱ्याच जणांना दिलासा दिला. मन्याने पहिल्या व्यक्तीकडे धाव घेतली. त्याच्या कडून दहा हजार घेऊन तिसऱ्याकडचे पाच हजार वसुल करून दुसऱ्याला बारा हजार देऊन टाकले- नशीबावर विसंबून न राहाता कौशल्याने तीन हजार मिळवले होते.